CMYK

## मुंबई इंडियन्सने आरसीबीवर विजयासह आयपीएलमधील आव्हान टिकवले

✔ **मुंबई :** सूर्यकुमार यादवच्या धडाकेबाज ८३ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने आरसीबीवर मोठा विजय साकारला. ग्लेन मॅक्सवेल आणि फॅफ ड्यु प्लेसिस यांच्या अर्धशतकांच्या जोरावर आरसीबीला मुंबईपुढे २०० धावांचे आव्हान ठेवता आले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला पहिल्या पॉवर प्ले पूर्वीच दोन धक्के बसले होते. पण सूर्याची ही खेळी काही वेगळीच होती. सूर्याने एकहाती मुंबईला हा सामना जिंकवून दिल्याचे पाहायला मिळाले. आरसीबीच्या २०० धावांचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात दणक्यात झाली. इशान किशनने २१ चेंडूत ४२ धावांची दणदणीत खेळी साकारली.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १० मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २२० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


**आयपीएल सामना क्र.५५**

CHENNAI SUPER KINGS Vs DELHI CAPITALS

चेन्नई विरुद्ध दिल्ली

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : चेन्नई

# मातेचा धावाधाव निष्फळ ठरला, पोटच्या गोळ्याचा जीव नाही वाचला

## ▪ विजेचा शॉक बसून सोलापुरात दहा वर्षाच्या मुलाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहराच्या लष्कर भागातील कुंभार गल्ली येथे एका दहा वर्षाच्या मुलाचा विद्युत मोटारीतील विजेचा शॉक बसून मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. शांतराज युवराज तल्लारे असे मरण पावलेल्या मुलाचे नाव आहे. घरात नळाचे पाणी भरून झाल्यानंतर शांतराज हा मोटार बंद करण्यासाठी गेला. तेव्हा शॉकबसून तो नळाजवळ निपचित पडला. मातेने आपल्या पोटच्या गोळ्याचा जीव वाचवण्याचा एकच धावाधाव केला. आईसह शेजारच्यांनी त्याला तातडीने शासकीय रूग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. बछड्याचा जीव वाचवण्याचा आईचा प्रयत्न अखेर निष्पळ ठरला. शेजारच्यांनी दाखवलेल्या मानवतेची नियतीला दया आली नाही. तल्लारे कुटुंबियावर ओढवलेल्या या प्रसंगानंतर लष्कर भागात शोककळा पसरली.**



झाले असे की, कुंभार गल्ली भागात सकाळी नळाला पाणी आले. शांतराजचे आई-वडील कामाला गेले होते. त्याची आजी वयोमानामुळे घरातच झोपून होत्या. पाणी आल्यानंतर शांतराजनेच पाणी भरण्याचे काम केले. घरात पाणी भरून झाल्यानंतर तो मोटार बंद करण्यासाठी गेला, तेव्हा विजेचा जबर धक्का त्याला बसला. धक्क्याने नळाजवळच तो पडला. हा प्रसंग पाहिल्यानंतर शेजारच्यांनी कुंभार गल्लीतच कामावर गेलेल्या आईला लगेच बोलावून घेतले. वडीलही आले. बेशुद्धावस्थेतील मुलाला पाहून आई-वडिलांनी हंबरडा फोडला. आईने व शेजारच्यांनी तातडीने त्याला शासकीय रूग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

शासकीय रूग्णालयात शेजारच्या लोकांची आणि नातेवाईकांची गर्दी झाली. शवविच्छेदनानंतर शांतराजचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. तत्पूर्वी महापालिकेचे अधिकारी आल्याशिवाय त्याचा मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली. काही वेळाने अधिकारी शासकीय रूग्णालयात आले. कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबद्दल तिथे जमलेल्या नागरिकांनी अधिकाऱ्यांपुढे संताप व्यक्त केला. पोलिसांनी समजूत काढल्यानंतर शांतराजचा मृतदेह ताब्यात घेतला. रात्री मोदी स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### नुकतेच देवकार्य केले होते...

शांतराज हा पाचवीत शिकत होता. मोठा भाऊही शाळेत जातो. आई वडील दररोज काम करून कुटुंब चालवतात. घरात कुणीही नाही म्हणून शांतराजने घरात पाणी भरले. तल्लारे यांचे कुटुंब गरीब पण देवावर श्रद्धा ठेवणारे. शनिवारी तेलंगणातील कृष्णा याठिकाणी देवकार्य करून ते आले होते. त्यांच्यावर ओढवलेला हा दुर्दैवी प्रसंग पाहून परिसरातील लोकांनाही अश्रू अनावर झाले होते.

### अनेक वर्षांपासूनची समस्या...

शहरात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असतो. त्यातून घरातील भांडी पाण्याने भरू शकत नाही. चार दिवसाआड पाणी येणार म्हटल्यानंतर शहरवासिय पाण्याचा स्टॉक करण्यासाठी मोटारी लावत असतात. जास्त दाबाने पाणी पुरवठा केल्यास मोटारी लावण्याची गरजच भासत नाही पण महापालिका असा पाणी पुरवठा करायला हतबल ठरली आहे. विघुत मोटारीचा शॉक बसून यापूर्वी अनेकांचा जीव गेला आहे.

### महावितरणचे आवाहन...

वास्तविक पाहाता मोटारी लावून पाणी घेणे नियमबाह्य आहे पण पिण्याच्या पाण्याची समस्या पाहून महावितरण त्याकडे मानवतेने पाहाते. शॉक बसून जीव जाण्याचा प्रकार पाहाता यात कुटुंबकर्त्यांचा निष्काळजीपणा दिसून येतो. विद्युत मोटारी चालू करताना व बंद करताना विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मोटारीच्याबाबतीत इलेक्ट्रीशनकडून सर्वप्रकारची दुरूस्ती करून घेतली पाहिजे. घरातील मुला-मुलींना मोटारीजवळ पाठवूच नये,असे आवाहन महावितरणच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने केले आहे.

## सायबर टेक कंपनीकडून महापालिका सर्व डाटा हस्तांतरित करून घेणार

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात मिळकतकरांचे सर्व्हेक्षण सायबर टेक कंपनीकडून करण्यात आले. दरम्यान या मिळकत सर्व्हेक्षणाला आता पाच वर्षे पूर्ण झाली आहे. सायबर टेक कंपनीकडून पूर्वी केलेल्या सर्व्हेक्षणाचा डाटा हस्तांतरित करून घेत आहे. त्याची प्रकिया सुरू झाली आहे.

सोलापूर शहरातील मिळकती करा संदर्भात सायबर टेक कंपनीकडून २०13 -१४ साली शहराचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते. ते सर्वेक्षण २०१६- १७ मध्ये पूर्ण झाले. दरम्यान, सर्वेक्षणाला पाच वर्षे पूर्ण झाल्यामुळे नियमित पंचवार्षिक रिव्हिजन म्हणून शहराचा पुन्हा एकदा सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सायबर टेक कंपनीकडून सर्व डाटा हस्तांतरित करण्याचे काम सुरू आहे. डाटा हस्तांतरांचे काम संपल्यानंतर बिलिंगचे सर्वर सुरू करण्यात येणार आहे.

### आठवडाभरात प्रकिया पूर्ण होईल : पोळ

सायबर टेक कंपनीचे सर्व बिल अदा करण्यात आले आहे. सायबर टेक कंपनीकडून पूर्वी केलेल्या सर्व्हेक्षणाचा डाटा हस्तांतरित करून घेण्याची प्रकिया सुरू झाली आहे. त्यानंतर सोलापूर महापालिका आणि सायबर टेक कंपनी यांच्यात कोणताही संबंध नसणार आहे. साधारणतः आठवडाभरात हे सर्वर सुरू होण्याची शक्यता आहे, असे पालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

## मैंदर्गी येथे वऱ्हाडाच्या जीपला अपघात




✔ सुराज्य/अक्कलकोट

मैंदर्गी (ता.अक्कलकोट) शिवारातील दुधनी रोडवरील लक्ष्मी मंदीराच्या कठड्यास वऱ्हाडाच्या वाहनाची धडक होऊन झालेल्या अपघातात तरूणाचा मृत्यू झाला तर काही वऱ्हाडी जखमी झाल्याची घटना मंगळवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली. शिवप्पा हणमंत जोगूर (वय ३०, बिदणुर ता.अफजलपूर जिल्हा गुलबर्गा) असे अपघातातील मयताचे नाव आहे.

याबाबतची फिर्याद मयताचे वडिल हणमंत सायबण्णा जोगूर (वय ७० वर्षे), धंदा-शेती रा. बिदणुर ता. अफजलपूर जिल्हा कलबुर्गी (गुलबर्गा) कर्नाटक यांनी दिली.

पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, मंगळवार दि. ९ मे रोजी दुपारी २ वा.च्या सुमारास फिर्यादीचा मुलगा जयप्पा हणमंत जोगूर यांच्या मुलीचे लग्न सोलापूर येथे असल्याने फिर्यादी व मुलगा जयाप्पा व गावातील इतर १५ ते १६ लोक असे सर्वजण मिळून बिदणुर येथून सकाळी ८ वा.च्या सुमारास महींद्रा पिकअप (गाडी नंबर के ए ३६ बी २८२१) या वाहनातून वऱ्हाड घेवून दुधनी, मैंदर्गी, अक्कलकोट मार्गे सोलापूरला मड्डीवस्ती येथे लग्ना करीता जात असताना सकाळी १० वा.च्या सुमारास मैंदर्गी शिवारातील शिवमल्हार धाब्या जवळ चालक व्हणाप्पा देवेंद्र डोंगरी यांचा ताबा सुटल्याने लक्ष्मी मंदीराच्या कठड्यास धडकून वाहन पलटी झाले. शिवप्पा हणमंत जोगूर यांच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली तर शामकुमार श्रीमंत चिकलगी, कुमार मुतप्पा जोगूर, शाहीकुमार दिंगबर हडपद (सर्व रा.बिदणुर) अपघातात जखमी झाले. वाहन चालका विरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.अधिक तपास पोलीस नाईक रफीक शेख हे करीत आहेत.

## डान्स शिक्षकाची गळफासाने आत्महत्या

✔ **सोलापूर :** जुना विडी घरकुल परिसरातील बी ग्रुप येथे राहणाऱ्या एका २९ वर्षीय डान्स शिक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास उघडकिस आली.

सागर दत्तात्रय धारा (वय २९ रा. जुने विडी घरकुल) असे मयताचे नाव आहे. काल सायंकाळी घरात कोणी नसताना त्याने किचन रूम मधील छताच्या हुकाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

मयत सागर धारा हा विवाहित असून त्याच्या पश्चात पत्नी आणि आई-वडील असा परिवार आहे. तो पुणे येथे डान्स शिक्षक म्हणून काम करीत होता. त्याची पत्नी सोलापुरात खाजगी नोकरी करते. काल घरात कोणी नसताना त्याने हा प्रकार केला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## डी मार्टच्या मागील झाडीत मृतदेह

✔ **सोलापूर :** जुळे सोलापूर येथील डी मार्टच्या मागे असलेल्या झाडी झुडपात एक मानवी मृतदेह कुजलेल्या व सडलेला अवस्थेत सोमवारी आढळला. माहिती विजापूर नाका पोलिसांना मिळाल्यानंतर फौजदार ए.एम. पोपळभर यांनी घटनास्थळी पोहोचून तो मृतदेह शव विच्छेदनासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केला.

## भंडीशेगाव येथे दिवसा घरफोडी; सव्वा लाखांचे दागिने गायब

✔ **पंढरपूर :** तालुक्यातील भंडीशेगाव येथे राहणाऱ्या रमेश किसन यलमार यांच्या बंद घराचा कुलूप तोडून तो चोरट्याने कपाटातील १ लाख ३५ हजार रुपये किमतीचे दागिने घेऊन पोबारा केला . ही घरफोडी रविवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.

भंडीशेगाव येथील चव्हाण वस्तीत रमेश यलमार हे राहण्यास आहेत. ते रविवारी सकाळी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. सायंकाळी परतल्यानंतर त्यांना दरवाजाचे कुलूप तोडल्याचे दिसले. तसेच कपाटाच्या लॉकर मधील २२ ग्रॅम सोन्याचे दागिने गायब झाल्याचे दिसून आले. त्याप्रमाणे यलमार यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहे.

## दुरूस्तीसाठी शटडाऊन; आज उशीरा पाणीपुरवठा




✔ **पंढरपूर :** विद्युत वितरण कंपनीकडून मंद्रुप सबस्टेशन येथील दुरुस्ती कामासाठी १० मे रोजी दुपारी २तास शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे टाकळी हेड वर्क्स येथून होणारा पाणी उपसा पुरेशा प्रमाणात होणार नसल्याने सोरेगाव जलशुद्धिकरण केंद्रावरुन होणारा १० मे रोजीचा नियोजीत पाणी पुरवठा उशीरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर विभागाकडून १३२ के.व्ही, ३३ के.व्ही मंद्रुप सबस्टेशनहून टाकळी हेड वर्क्सला ३३ के.व्ही उच्च दाबाने विद्युत पुरवठा केला जातो. विद्युत वितरण कंपनीच्या विनंती नुसार मंद्रुप सबस्टेशन विभागाकडून मंद्रुप सबस्टेशन येथील दुरुस्ती कामासाठी १० मे रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत शटडाऊन घेणेत येणार आहे. त्यामुळे टाकळी हेड वर्क्स येथून होणारा पाणी उपसा पुरेशा प्रमाणात होणार नसल्याने सोरेगाव जलशुद्धिकरण केंद्रावरुन होणारा १० मे २०२३ रोजीचा नियोजीत पाणी पुरवठा उशीरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे, असे महापालिकेचे कार्यकारी अभियंता तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता विजयकुमार राठोड यांनी कळवले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



संकेत मिळालेत मग चिठ्ठ्या काढू या!

| कल्याण |
|---|
| 229-37-124 |

| मेन बाजार |
|---|
| ---------- |

## कर्नाटकात आज 'रणसंग्राम'




✔ सुराज्य/बंगळुरू

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही तास उरले आहेत. सत्तेच्या चाव्या कुणाच्या हाती हे बुधवारी ठरणार आहे. १० मे रोजी सकाळी ७ वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. यंदाच्या निवडणुकीसाठी कर्नाटकातील ५ कोटी ३१ लाख मतदार मतदान करणार आहेत.**

राज्यातील २ हजार ६१५ उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहेत. कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. राज्यभरातील एकूण ५८ हजार ५४५ मतदान केंद्रांवर मतदान करण्याची सुविधा करण्यात आली आहे. मतदानादरम्यान एकूण ७५ हजार ६०३ बॅलेट युनिट, ७० हजार ३०० कंट्रोल युनिट आणि ७६ हजार २०२ व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल वापरण्यात येणार आहे.

राज्यभरातील एकूण ५,३१,३३,०५४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदारांमध्ये २,६७,२८,०५३ पुरुष तर २,६४,००,०७४ महिला मतदार आहेत. राज्यात ११,७१,५५८ तरुण मतदार आहेत, तर ५,७१,२८१ शारीरिकदृष्ट्या अपंग आहेत. १२ लाख १५ हजार ९२० मतदार हे ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी एकूण २ हजार ६१५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामध्ये २ हजार ४३० पुरुष तर १८४ महिला उमेदवार आहेत. तर एका तृतीयपंथीय उमेदवाराचाही समावेश आहे. सर्व उमेदवारांचे भवितव्य बुधवारी मतदान पेटीत बंद होणार आहे. कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी महिनाभर जोरदार प्रचार केला आहे.

राज्यातील जनता सत्तेच्या चाव्या कुणाकडे देणार हे उद्या ठरणार आहे. भाजप सत्ता कायम ठेवणार की काँग्रेस सत्तेत येणार हे बुधवारी ठरणार आहे. बुधवारी मतदान होऊन १३ मे रोजी मतमोजणी होणार आहे. कर्नाटमध्ये पाच वर्षांनी राज्यात सत्ताबदल होतो. हा समज मोडून काढण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यात प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून आले. तर दुसरीकडे काँग्रेसच्या राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि सिध्दरमय्या व डी. के. शिवकुमार या नेत्यांनी तोडीस तोड काम करत प्रचाराचा धडाका लावला होता.

CMYK

# खाद्य तेलांची स्वस्ताई

आपल्या देशात खाद्यतेलाचे दर उतरत आहेत. सर्वसामान्यांसाठी ही बाब दिलासादायक म्हणावी लागेल. भाकरी-चटणी आणि त्यावर तेलाचे दोन थेंब हे गरीबबापड्यांचे रोजचे अन्न. श्रीमंतांना महागाईची फिकिर नसते पण त्याचे चटके सर्वसामान्यांना बसत असतात. मध्यंतरी तेलाचे दर गगनाला भिडले होते पण आता त्यात घसरण होऊ लागली आहे. त्याची कारणेही आता समोर आली आहेत. भारतातील खाद्यतेल उद्योगावर आणि तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांवर याचा काय परिणाम होईल. देशांतर्गत खाद्यतेल बाजारात स्वस्ताईचे वारे वाहात आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात खाद्यतेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. जागतिक बाजारात खाद्यतेलाचे दर घसरले असतानाही भारताने खाद्यतेल आयातीवरील कर कमी केले आहेत. त्याचा परिणाम म्हणून देशात खाद्यतेलाचा प्रचंड साठा निर्माण झाला आहे. बंदरांवर खाद्यतेलाने भरलेली टँकर जहाजे उभी आहेत. यंदाच्या वर्षातील पहिल्या चार महिन्यांत खाद्यतेल आयात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. परिणामी मे २०२२ च्या तुलनेत मे २०२३ मध्ये सूर्यफूल, सोयाबीन आणि पामतेलाच्या प्रति किलो दरात सरासरी ८० रुपयांनी घट झाली आहे. देशाला एका वर्षात सरासरी १२० लाख लीटर खाद्यतेलाची गरज असते. त्यापैकी सुमारे ६० टक्के खाद्यतेलाची आयात करावी लागते. त्यामुळे देशात किती तेलबियांचे उत्पादन झाले यावर खाद्यतेलाचे दर ठरत नाहीत, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर तेलबिया उत्पादन, खाद्यतेलाची उपलब्धता, कर आणि व्यापार सुगमता यावर खाद्यतेलाचे दर कमी-जास्त होतात. रशियाने लादलेल्या युद्धामुळे युक्रेन आणि शेजारील देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादित होणारे सूर्यफूल बिया आणि सूर्यफूल तेल यांची निर्यात विस्कळीत झाली होती. शिवाय मागील वर्षी पामतेलाचा पुरवठा कमी झाला होता. त्याचा परिणाम म्हणून खाद्यतेल सरासरी २५० ते २७० रुपये किलोपर्यंत गेले होते. सध्या युक्रेन-रशिया युद्धाची तीव्रता कमी झाली आहे. आयात-निर्यात व्यापार सुरळीत सुरू आहे. त्यामुळे युक्रेन आणि शेजारील देशांमधून जगभरात



सूर्यफूल बिया आणि सूर्यफूल तेल, कच्चे सूर्यफूल तेल यांची निर्यात वेगाने सुरू आहे. परकीय चलन मिळवण्यासाठी युक्रेन मोठ्या प्रमाणात सूर्यफूल तेलाची निर्यात करत आहे. त्यामुळे जागतिक बाजारात युक्रेन आणि शेजारच्या देशांतून येणाऱ्या सूर्यफूल तेलाचा मोठा दबाव आहे. सूर्यफूल तेलाचे दर हे शेंगदाणा तेलाच्या खालोखाल असतात. सूर्यफूल आरोग्यदायी तेल मानले जाते. त्यामुळे ते पामतेल आणि सोयाबीन तेलापेक्षा महाग असते. पण सूर्यफूल तेल इतक्या मोठ्या प्रमाणात बाजारात येत आहे की सूर्यफूल तेल सोयाबीन आणि पामतेलाच्या बरोबरीने विकले जात आहे. खाद्यतेल बाजारावर सूर्यफूल तेलाचा मोठा दबाव असल्यामुळे प्रामुख्याने अन्य तेलातही स्वस्ताई दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात खाद्यतेलाच्या दरात स्वस्ताई आल्यामुळे देशातील खाद्यतेलाच्या उद्योग आणि आयातदारांनी प्रचंड प्रमाणात आयात केली आहे. २०२३च्या पहिल्या चार महिन्यात म्हणजे साधारण ७० लाख टन तेलाची आयात केली. मागील वर्षी याच काळात ५६ लाख टन आयात झाली होती. यात प्राधान्याने पामतेल आणि सूर्यफूल तेलाचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात आयात करू नये. देशातील खाद्यतेलाचा उद्योग अडचणीत येईल, अशी मागणी खाद्यतेल उद्योगानेच केली होती. खाद्यतेलाची ही प्रचंड आयात मागील साडेचार महिन्यात झाली आहे. खाद्यतेलाच्या भरमसाठ आयातीमुळे देशांतर्गत तेलबियांच्या दरावर मोठा परिणाम होत आहे. मागील वर्षी सोयाबीनचे दर प्रति क्विंटल सरासरी दहा हजारांवर गेले होते. यंदा हाच दर सरासरी सात हजार ते आठ हजार रुपये आहे. जागतिक बाजारात तेलाचे दर पडल्याचाच हा परिणाम आहे. भारतातील आयातीवर काही प्रमाणात नियंत्रण लादून शेतकऱ्यांना जास्तीचा दर देणे शक्य होते. पण सरकारने तसे केले नाही. अशीच स्थिती मोहरीची (सरसों/राई) आहे. मोहरीचे उत्पादन प्रामुख्याने मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि गुजरातच्या काही भागात होते. या भागातील शेतकऱ्यांना यंदा मोहरी हमीभावापेक्षा कमी दराने विकावी लागत आहे. जागतिक बाजारात दर पडणे आणि भरमसाट आयात यामुळे देशांतर्गत तेल उद्योगातून मागणी कमी झाल्यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही, अशी शेतकरी तक्रार करीत आहेत. सोयाबीनबाबत समाधानाची बाब इतकीच की, मागील वर्षीइतका दर मिळत नसला तरी हमीभावापेक्षा जास्तीचा दर शेतकऱ्यांना मिळत आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या दरांचे अर्थचक्र असते, त्यात कधी कधी जसा तोटा असतो, तसा फायदाही असतो. महागाई वाढली की, ओरड व्हायला लागते. स्वस्ताई झाली की, त्यावर कुणीच बोलत नाही. ही मानसिकता बदलायला हवी.

क्रीडा जगत

# ताराराणीने दिले मुलींच्या कुस्ती क्षेत्राला बळ

पुरुषप्रधान संस्कृतीच्या आपल्या या भारत देशामध्ये आजपर्यंत महिलांची कुचंबणा झाल्याचे पहावयास मिळत आलेले आहे पण अलीकडील काळात वेगवेगळी क्षेत्रे महिला पादाक्रांत करीत असल्याने महिलाही प्रत्येक क्षेत्रात अग्रेसिव्ह पणे काम करताना दिसत आहेत. घटनाकारांनी दिलेल्या घटनेच्या माध्यमातून महिला शिकू लागल्या, पुढे येऊ लागल्या, पुरुषांच्या बरोबरीने त्या राहू लागल्या. पण तरीही काही क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग हा अगदी शून्य टक्के होता असेच म्हणावे लागेल याचे कारण असे की कुस्ती हा खेळ पुरुषांचा समजला जात होता आणि यामध्ये महिलांच्या कुस्त्या याविषयी चर्चा सुद्धा होताना दिसत नव्हत्या. पण काळ बदलला प्रत्येक क्षेत्राप्रमाणे असंख्य मुली कुस्ती क्षेत्रामध्ये देखील येऊ पाहत होत्या मात्र, वातावरण निर्मितीचा अभाव, अपेक्षित व्यासपीठ उपलब्ध होत नसल्याने अशा क्रीडा खेळाडूंचे खच्चीकरण होताना दिसत होते. अगदी कुस्तीगीर परिषदेने देखील या महिलांच्या कुस्ती विषयी आजपर्यंत अनास्थाच दाखवलेली दिसते आहे. अशा अवस्थेत मुली कुस्ती क्षेत्रात आल्या पाहिजेत, त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या देशाचे नाव कमावले पाहिजे या ध्यासाने प्रेरित होऊन अकलूज येथील शीतलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी यामध्ये धाडसाने पाऊल टाकले आणि ताराराणी कुस्ती केंद्राच्या माध्यमातून मुली खेळाडूंना एक प्रशस्त व भव्य दिव्य व्यासपीठ निर्माण करून दिले. यातून अनेक मुली जिल्हा, राज्य पातळीवर चमकू लागल्या, अनेक खेळाडू मुलींचा ओढा कुस्तीकडे वळू लागला आणि आज या मुलींच्या कुस्ती खेळाला सन्मान प्राप्त झाला आहे. राज्यामध्ये महिला सक्षमीकरणासाठी ज्या महिला कार्य करतात, त्यामध्ये आता शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. डॉटर्स मॉम फाउंडेशन, शिवरत्न शिक्षण संस्था या माध्यमातून त्यांनी आजपर्यंत महिला सबलीकरणाची जी चळवळ राबवली आहे ती खरोखरच असंख्य महिलांना दिशा देणारी तर आहेच मात्र, देशाला देखील एका अनोख्या वळणावर नेऊन ठेवणारी वाटत आहे. त्यांच्या माध्यमातून आज अनेक महिला विविध क्षेत्रात कार्य करताना दिसत आहेत ही खरोखरच यशाची पावती म्हणावी लागेल. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आजपर्यंत अनेक उपक्रम राबविले आहेत. अनेक वेळा प्रयत्न करून सुद्धा महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा होत नसल्याने त्या नेहमी खेद व्यक्त करीत होत्या.

पुरुषाप्रमाणेच महिलांच्याही राज्यात भव्य दिव्य महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा झाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी अनेक वेळा प्रयत्न केले पण यश येत नसल्याने स्वतःच अशा स्पर्धा भरवाव्यात असा विचार त्यांच्या मनात आला आणि पती धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सोबतीने त्यांनी भव्य दिव्य ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा भरविल्या आणि या माध्यमातून असंख्य मुली महिला खेळाडूंना त्यांना त्यांचे हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले.

दि. ५, ६ आणि ७ मे २०२३ या तीन दिवस चाललेल्या कुस्ती स्पर्धेमुळे महिलांच्या मनात कुस्तीबद्दल आत्मिक बळ निर्माण झाले. या स्पर्धेत खेळलेल्या अनेक खेळाडूंमुळे बघणाऱ्यांच्या मनात देखील आपण सुद्धा आपल्या घरातील मुलगी कुस्ती क्षेत्रात पाठवूया असा विचार येऊ लागला आहे. अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे झालेल्या या कार्यक्रमाचे नियोजन इतके दैदिप्यमान करण्यात आले होते की अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्याप्रमाणे कुस्तीसाठी मॅट निर्माण केले जातात अगदी तशीच परिस्थिती या ठिकाणी निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे या माध्यमातून आता आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्यातील मुली महिला खेळाडू पुढे चमकू शकतील असा एक आंतरिक विश्वास निर्माण झाला आहे.

कुस्ती क्षेत्राला खरोखरच शितलदेवी मोहिते-पाटील आणि धैर्यशील मोहिते-पाटील हे जणू वरदानच लाभले आहेत. इतके मोठे नियोजन करून एवढ्या मोठ्या स्पर्धा ग्रामीण भागात घेणे आणि त्यातून राष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्याची प्रत्येकाच्या मनात ऊर्जा निर्माण करणे ही खरोखरच साधी सोपी गोष्ट नाही पण या दाम्पत्याने केलेले हे महान कार्य देशवासीय कधीही विसरू शकणार नाही. कुस्ती हा जरी आपला मातीतला खेळ असला तरी आंतरराष्ट्रीय स्पर्धा मॅटवर असल्याने आपला देश कुस्ती क्षेत्रात पूर्वीपासून पुढे असला तरी तो मॅट मुळे मागे पडत होता आणि हाच विचार करीत अलीकडील काळात या स्पर्धा मॅटवर घेतल्या जात आहेत.

**मोहिते-पाटील कुटुंबांनी नेहमी कुस्तीची जोपासना केली अगदी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्यापासून ते आजची त्यांची तिसरी पिढी कुस्तीची परंपरा जोपासताना दिसते आहे. सर्वच मल्लासाठी वर्षभर विविध स्पर्धेचे आयोजन देखील या ठिकाणी करण्यात येते. पण मुलींच्या कुस्तीसाठी शितलदेवी मोहिते-पाटील यांनी केलेले प्रयत्न खरोखरच प्रेरणादायी वाटतात. आज त्यांच्या माध्यमातून अनेक मुली या क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी पुढे येऊ लागल्या आहेत. ताराराणी कुस्ती केंद्राच्या माध्यमातून त्यांनी टाकलेले पाऊल ते आज ताराराणी महाराष्ट्र केसरीपर्यंत गेले आहे. यातून देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या मुली खेळाडू बाहेर पडतील यात शंका नाही.**

शितलदेवी मोहिते-पाटील यांची मुलींच्या कुस्तीसाठी चाललेली धडपड कोणीही विसरू शकणार नाही. संपूर्ण देशामध्ये ग्रामीण भागात अगदी पहिल्यांदाच इतका मोठा भरगच्च कार्यक्रम



अर्थातच मुलींच्या कुस्ती स्पर्धा त्यांनी पार पाडल्या आहेत. त्यामुळे त्यांना धन्यवाद द्यावे तितके कमीच आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज असंख्य मुली घराबाहेर पडून आपापल्या कौशल्यानुसार स्वाभिमानाने जीवन जगताना दिसत आहेत. महिलांच्या उद्धारासाठी सबलीकरणासाठी शितलदेवी मोहिते-पाटील या अविरतपणे कार्य करताना दिसत आहेत. त्यांच्या कार्याला आणखी बळ मिळो...आणि त्यांनी आयोजित केलेल्या ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धेमुळे अनेक मुली कुस्तीपटूंचे जीवन बदलले आहे. त्यांच्या आत्मविश्वासावर बसलेल्या धुळीवर शितलदेवी मोहिते-पाटील यांनी फुंकर मारली आहे. आणि यामुळे आज मुली वाघिणीसारख्या लढताना दिसत आहेत.


**- डी. एस. गायकवाड, अकलूज.**

टुडेज् ब्लॉग

# सांगलीचे विलोभनीय गणेश मंदीर

**गेल्या सुमारे दोनशे वर्षापूर्वीचे सांगली येथील गणेश मंदीर हे अतिशय सुंदर आहे. पुण्याहून सांगली हे सुमारे २३५ किलोमीटर अंतर असून कोल्हापुरहून सुमारे ५५ किलोमीटर अंतर आहे. एक तासात कोल्हापूरहून सांगलीस जाता येते. कोल्हापुरात विमानाने उतरूनही सांगलीत पोहचता येते. पुण्याहून रेल्वेनेही सांगलीला जाता येते. सांगली हे जिल्ह्याचे ठिकाण असून स्वातंत्र्य लढ्यापासून हे प्रसिध्द आहे. स्वातंत्र्यलढ्यातील प्रसिध्द पत्री सरकार हे सांगली जिल्ह्यातीलच होते. स्वातंत्र्यपूर्व काळात येथे अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी या मंदीरात आश्रय घेतला होता. शहरात राहण्यासाठी अनेक प्रसिध्द लॉज व हॉटेल्स आहेत. एस. टी. ची वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. देवळाभोवतालचा कृष्णा नदीचा घाट व परिसर अतिशय सुंदर आहे. नदीचे विस्तीर्ण पात्र व त्याला लागूनच असलेला अतिसुंदर आर्यविन पूल यांनी देवालयाच्या परिसराला एक वेगळीच शोभा आणली आहे. सांगली शहरातील अनेक नागरीक या गणेशाचे भक्त आहेत. गणेशचतुर्थीला या देवळाला अनेक भाविक भेट देतात.**

समोरून दिसणारे मंदीराचे प्रवेशद्वार देवालयाचा इतिहास सांगलीचे ग्रामदैवत गणेश मंदीर गेले सुमारे दोनशे वर्षे प्रसिध्द आहे. आजही येथील नागरीक कोणताही नवीन उपक्रम गणपतीच्या दर्शनाशिवाय करत नाहीत. सांगलीचे पटवर्धन व मिरजेचे पटवर्धन यांच्यात १७९९ साली मिरज व सांगली अशी वाटणी झाली. सांगली हे शहर त्यावेळी केवळ पाच हजार वस्तीचे होते. सांगलीचे थोरले चिंतामणराव पटवर्धन यानी सांगलीची स्थापना करून गणेशदुर्गाची स्थापना केली. सांगली



ही त्यानी संस्थानची राजधानी निश्चित केली व गणपती मंदीराचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतला. कोकणातील कोतवडे हे गांव सांगलीच्या पटवर्धनांचे मूळचे गाव. या गावातही सांगलीप्रमाणेच श्री गणेश, शिव, सूर्य, चिंतामणेश्वरी व लक्ष्मीनारायण अशा पाच देवांची मंदीरे आहेत. या देवालयाचे बांधकाम १८१० साली सुरू झाले व ते सुमारे तीस वर्षे चालले होते. १९४४ दरम्यान ते पूर्ण झाले.

अहिल्याबाई होळकर यांनी जो दगड महाबळेश्वर येथे मंदीरात वापरला होता, त्यातील एका दगडाच्या मूर्ती तयार करण्यात आल्या. शास्त्रानुसार मूर्ती कशा असाव्यात याबद्दलचा तपशील पुण्यातील त्यावेळचे प्रसिध्द वेदशास्त्रसंपन्न चिंतामण दीक्षित यांच्याकड्न मागविण्यात आला होता. श्री गणपतीच्या पंचायतनाच्या प्रत्येक देवाच्या सिंहासनाखाली सोने, रूपे व पंचरत्ने घातली होती. त्यासाठी मोठा खर्चही झालेला होता. या देवळासाठी जो काळा दगड वापरण्यात आला होता तो ज्योतीबाच्या डोंगराहून आणण्यात आला होता. देवालयातील सर्व मूर्तीच नव्हे तर प्रत्येक दगड वास्तुशास्त्र व धर्मशास्त्रानुसार घडविलेला आहे असे उल्लेख आहेत.

ऋध्दि-सिध्दीसह सर्व देवतांच्या मूर्ती स्थानिक कलाकारांनी घडविलेल्या आहेत. भीमण्णा पाथरवट व मुकुंदा पाथरवट अशी त्यांची नावे आहेत. त्याबद्दल राजेसाहेबांनी त्यांना सोन्याचे कडे त्याकाळी बहाल केले होते. मूर्तीसाठी शुभ्र संगमवरी दगड कळस कुमारी नावाच्या स्थानिक कलाकारांकडून करून घेतले होते. कळसाला सोने देण्यासाठी दोन व्यक्तींची फार मोलाची मदत झाली. ते होते हरिहर लिमये व गोपाळ बावधनकर हे होत. देवालयाचे कामकाज सन १८४५ मध्ये पूर्ण झाले. त्यावेळी चैत्र शुध्द पंचमीला मोठा 'अर्चा' समारंभ घडवून आणण्यात आला होता. शिखराचे काम १८४७ मध्ये पूर्ण झाले. गणपती मंदीरासह मंदीराचा सभोवतालचा परिसर श्रीमंत विजयसिंह पटवर्धन यांनी अलिकडे या मंदीराचे रुप विलोभनीय केले आहे. परिसरात कारंजे व उद्यानाची निर्मीती केली असून पाणपोई, प्रदक्षिणा मार्ग, मंगल कार्यालय व सुनिती पटवर्धन यांच्या नावे सुनीती भवन याची उभारणी केली आहे. मंदिरात अनेक फलक बसविले असून त्यातून मंदीराचा इतिहास लिहिला आहे. अलिकडेच नवग्रह मंदीरही उभारले आहे. मंदीर कृष्णाकाठी उभारले असून त्याची व्याप्ती दोन एकर एवढी आहे. हे मंदीराचे प्रवेशद्वार तांबड्या कुरूंदाच्या दगडाचे आहे. ते अतिशय विलोभनीय आहे. आतील भागाची रचना काळ्या दगडाची आहे. मंदीरातील मूर्ती गणपती पेठेतून खूपच लांबूनही दिसतात हे या देवळाचे वैशिष्ट्य आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

जन्म हा अखेरचा

# इंद्रियानुग्रहस्थल - १



परंतु शब्द जेव्हा प्रतिकूल असतील म्हणजे जर कोणी आपली निंदा करीत असेल तर तेव्हा त्या माणसांविषयी आपल्या मनात द्वेष उत्पन्न होतो. याचप्रमाणे रुप, रस आणि गंध या विषयांच्या बाबतीत घडते. ते अनुकूल असतील तर आपल्या मनात प्रेम आणि प्रतिकूल असतील तर द्वेष उत्पन्न होतो. विषयांची अनुकूलता-प्रतिकूलता हेच राग द्वेषाचे कारण असते. एक मनुष्य आयुष्यभर कोणाचा द्वेष करु शकत नाही किंवा कोणावर प्रेमही करु शकत नाही. तो कधी त्याच्याविषयी प्रेम प्रकट करील तर कधी द्वेष, राग-द्वेष उत्पन्न झाले तर काय बिघडते? असा प्रश्न एखाद्याला पडेल. परंतु संतांनी वारंवार सांगितले आहे की, राग-द्वेष हेच पुनर्जन्माचे कारण होय. ज्याच्या मनातून राग-द्वेषाचे उच्चाटन झालेले असते, त्याला पुन्हा जन्म घेण्याचे कारण उरत नाही. मनुष्य पुन्हा जन्म घेतो, तो रागामुळे अथवा द्वेषामुळे. तुम्ही जेव्हा एखाद्याला वारंवार भेटायला जाता ते त्याच्याविषयी अनुराग असल्यामुळे. जेव्हा एखादा माणूस तुमच्याकडे पुन्हा-पुन्हा येतो ते तुम्हांला त्याच्या द्वेषाचा बळी बनवण्यासाठी. याप्रमाणे याप्रपंचात वारंवार येण्यासाठी राग-द्वेष कारणीभूत असतात.

राग पाहिले तर द्वेष हे दुसरे कारण आहे. ज्याच्याविषयी तुमच्या मनात प्रथम अनुराग नसेल त्याच्याविषयी नंतर द्वेष उत्पन्न होण्याचे कारण नाही. म्हणून राग हे भवबीज अर्थात् संसाराचे कारण मानले जाते. रागामुळे जीवात्मा असंख्य वेळा जन्म घेतो आणि असंख्य वेळा मरतो. जन्म-मृत्यूचा एवढा प्रवास करुन मनुष्य थकत नाही हेच मोठे आश्चर्य होय. सामान्यांच्या मनात राग-द्वेष असतात, परंतु योग्याच्या मनात मात्र ते नसतात. योग्यांचे आणि सामान्य माणसांचे दैनंदिन व्यवहार सारखे दिसत असले तरी त्याच्या मनात राग-द्वेष नसल्यामुळे त्याच्या आणि सामान्य माणसाच्या व्यवहारात खूप अंतर पडलेले असते. ज. रेणुकाचार्य या निमित्ताने सर्व मानवांना उपदेश करतात की, इंद्रियांचा आणि विषयांचा संबंध झाला तरी हरकत नाही, परंतु मनात राग-द्वेष असू नये. इंद्रिय-विषय संबंधामुळे जर मनावर राग-द्वेषाचे ओरखडे उमटले तर तो संबंध वाईट होय.

अक्कमहादेवींने म्हटले आहे की, सापाशी खेळणे धोकादायक नाही, परंतु त्याचे विषारी दात आधी काढावेत. त्याप्रमाणे शब्दस्पर्शादी विषयांचा भोग घेणे वाईट नाही, परंतु त्यामुळे राग-द्वेष उत्पन्न होत नसतील तर....


**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# पंडित शिवकुमारांना नमन...

गेली सहा-सात दशके संतूरच्या तालावर जगाला मंत्रमुग्ध करणारे आणि जम्मू-काश्मीरच्या प्रदेशातून संतूरला जागतिक पटलावर मान-सन्मान मिळवून देणारे पंडित शिवकुमार शर्मा यांचा १० मे हा पहिला स्मृतिदिन. गतवर्षी त्यांचे हृदयविकाराने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले होते. १३ जानेवारी १९३८ रोजी जम्मू येथील संगीतकार पंडित उमादत्त शर्मा यांच्या पोटी शिवकुमार यांचा जन्म झाला आणि संतूरचा भाग्योदय झाला, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

वयाच्या १७ व्या वर्षी जेव्हा शिवकुमार यांनी मुंबईत पहिला सार्वजनिक कार्यक्रम सादर केला, तेव्हापासून संतूर आणि भारतीय शास्त्रीय संगीत यांचे अतूट नाते निर्माण झाले. शिवकुमार आणि संतूरची लोकप्रियता पाहून १९६० मध्ये ज्येष्ठ चित्रपट निर्माते व्ही. शांताराम यांनी वसंत देसाई त्यांचे संगीत असलेल्या 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटात संतूरला प्रथम संधी दिली. त्यानंतर १९६७




मध्ये आलेल्या त्यांच्या 'कॉल ऑफ द व्हॅली' या अल्बम मध्ये सुप्रसिद्ध बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया हे देखील शिवकुमार यांच्यासोबत जोडले गेले. यानंतर शिवकुमार शर्मा आणि हरिप्रसाद चौरसिया यांनी संतूर आणि बासरीवर जुगलबंदीची नवी परंपरा सुरू केली, जी लोकांना खूप आवडली. या दोघांनी १९८१ मध्ये 'शिव-हरी' नावाने 'सिलसिला' या चित्रपटाला पहिल्यांदा संगीत दिले. त्यानंतर चांदणी (१९८९), लम्हे (१९९१), डर (१९९३), फासले (१९८५) आदी चित्रपटांमध्येही त्यांना संधी मिळाली.

दिवंगत श्रीदेवी अभिनित 'लम्हे' सिनेमातील 'मोरनी बागा मा' हे गाणे खूप गाजले होते. पद्मश्री आणि पद्मभूषणसह इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या शिवकुमार शर्मा यांचे संतूर गायन ज्यांनी जेव्हा-जेव्हा ऐकले तेव्हा ते त्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांचे संतूर ऐकताना आपण काश्मीरच्या सुंदर दऱ्याखोऱ्यात बसलो आहोत, जिथे झऱ्यांचा खळखळाट आहे आणि पक्ष्यांचा किलबिलाटही आहे, असे वाटायचे.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

**संत चोखामेळा (चोखोबा) यांची आज पुण्यतिथी.चोखामेळा हे यादव काळातील नामदेवांच्या संतमेळ्यातील वारकरी संतकवी होते. चोखोबांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा या गावी झाला. पण त्यांचा जन्मा पंढरपूरला झाल्याचे संत महाबती असे सांगतात. ते वऱ्हाडातील आहेत असे म्हटले जाते.**

# यादव कालीन संतकवी संत चोखामेळा



संत चोखोबा हे एक संत ज्ञानेश्वर यांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरू होते. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे तुकोबा होरपळून निघाले. ते शूद्र अतिशूद्र गाव वाडा समाज जीवन भौतिक व्यवहार उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात अडकले होते. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते. ते उदरनिर्वाहासाठी कबाड कष्ट मोलमजुरी करत होते. पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावातील या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्य, वैपुल्य यामुळे ते जीवनात अस्वस्थ होते.

परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले. त्यांना संतसंग लाभला, त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. श्री विठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उराउरी भेटावे असे खूप वाटत होते. परंतु ते सावळे गोजिरे रूप महाद्वारातून पहावे लागले. ही खंत त्यांच्या मनात होती, चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेव यामुळे तेराव्या शतकात उदयाला आली म्हणून संत चोखोबा म्हणतात. 'यावे शुद्ध होऊन जावे', असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्म अनिष्ट अभेद भक्तिचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचविले.

संत चोखोबा हे आपल्या उदरनिर्वाहासाठी पंढरपुरी येथे गेले असता विठ्ठल भक्तीत दंग झाले ते सदैव पांडुरंगाचे नामस्मरण व भजनात रंगून जायचे. त्यावेळी मंगळवेढे नगरी भरभराटीस आली होती. शके १२६० ला मंगळवेढ्यातील विशीच्या तटाची भिंत कोसळली होती व तिचे बांधकाम करण्यासाठी पंढरपूरचे मजूर आणण्यासाठी दुध पंढरपुरी आला आणि त्यासोबत चोखामेळा तटाच्या भिंतीच्या बांधकाम करण्यासाठी सहकुटूंब मंगळवेढ्यात आले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत होते. पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग होते.

त्यांच्या कुटुंबातील सर्वजण हरिभक्त पारायण करत असत. त्या सर्वांचे श्री विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते. त्यांची पत्नी सोयराबाई हिचे बाळंतपण स्वतः विठाई माऊलीने नणंदेचे रूप घेऊन केले. अशी कथा प्रचलित आहे. संत चोखोबांचा मुलगा कर्ममेळा हा पण संत परंपरेत आहे. सोयराबाई व कर्ममेळा यांच्याही काही सुंदर अभंग रचना आहेत. संत चोखोबांचे मेव्हणे बंका महार व बहीण निर्मळा यांच्याही काही रचना आहेत.

संत चोखोबांच्या भक्तिची उंची फार मोठी होती. ते स्वतःला विठू पाटलाचा बल्लेतूदार म्हणून समजत असत. परंतु किल्ल्याच्या पूर्वेकडील वेशीचे बांधकाम सुरू असताना एके दिवशी उजळ भिंत कोसळली व त्याखाली श्री चोखोबा आणि अनेक मजूर मयत झाले. ही घटना १२६० म्हणजे इ. स. १३३८ मध्ये वैशाख, वद्य पंचमीस घडली. पुढे श्री संत नामदेव महाराज हे मंगळवेढ्यास आले. ज्या हाडांमधून 'विठ्ठल विठ्ठल' असा आवाज येत होता, त्या अस्थी श्री चोखामेळा यांच्या आहेत. असे ओळखून त्यांनी त्या पंढरपुरी विठ्ठल मंदिरापुढे सध्या नामदेव पायरी समाधी जवळ त्यांची समाधी बांधली.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सोलापूर लोकसभा लढवण्यावर काँग्रेस ठाम; राष्ट्रवादीकडून डिवचण्याचा प्रयत्न सुरूच

सुराज्य/अजित उंब्रजकर

**सोलापूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस लढण्यास इच्छुक असल्याचे यापूर्वी आमदार रोहित पवार यांनी सांगत काँग्रेसला चिमटा काढला होता. आता राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या दौऱ्यात सोलापूर लोकसभा राष्ट्रवादीने लढवावी का याबाबत चर्चा झाली. त्याच दिवशी जिल्हा दौऱ्यावर आलेले काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोलापूर लोकसभा सुशीलकुमार शिंदे यांनी लढवावी, असे सांगत हा मतदारसंघ काँग्रेसकडेच राहील, असे संकेत दिले. एकीकडे काँग्रेस सोलापूर लोकसभेवर ठाम असताना दुसरीकडे राष्ट्रवादीकडून मात्र सोलापूरवर दावा सांगून वारंवार काँग्रेसला डिवचण्याचे काम होत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील अनेक विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी ला दिल्यावर काँग्रेस आता सोलापूर लोकसभा मतदारसंघ काँग्रेसला देणार की स्वतःकडे ठेवणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व मतदारसंघात काँग्रेसचे वर्चस्व होते. मात्र १९९९ मध्ये राष्ट्रवादीची स्थापना शरद पवार यांनी केली. त्यावेळी पवारांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातही अनेक नेत्यांचा समावेश होता. त्यामुळे १९९९ नंतर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या विधानसभेचे चित्र बदलले. काँग्रेसचे अनेक विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या वाट्याला गेले.

सद्यस्थितीला काँग्रेसकडे शहर मध्य, दक्षिण आणि अक्कलकोट हे तीनच विधानसभा मतदार संघ आहेत. गत विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडे असलेल्या पंढरपूर मतदार संघ तसेच शहर उत्तर हा मतदारसंघ राष्ट्रवादीने घेतला. सध्या दक्षिण हा मतदारसंघ काँग्रेसकडे असला तरी येथून दिलीप माने निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत मात्र दिलीप माने यांचा ओढा सध्या राष्ट्रवादीकडे आहे. त्यामुळे आगामी काळात दक्षिण विधानसभा मतदारसंघावरून काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये वाद होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीकडे माळशिरस, माढा, करमाळा, पंढरपूर, मोहोळ आणि बार्शी असे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेची जागाही राष्ट्रवादीकडेच आहे. याशिवाय माढा लोकसभा मतदारसंघही त्यांच्याकडेच आहे. सांगोला विधानसभा मतदारसंघ पूर्वी काँग्रेसकडे होता मात्र शेकापबरोबर युती झाल्यामुळे त्यावरचा दावाही काँग्रेसला सोडावा लागला. त्यामुळे एकेकाळी जिल्ह्यावर वर्चस्व असलेली काँग्रेस आता केवळ तीन विधानसभा मतदार संघात उरल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रवादीने काँग्रेसचे अनेक मतदारसंघ आपल्याकडे खेचत जिल्ह्यातील काँग्रेसला कमकुवत करण्याचा प्रयत्न केला आहे, हे वास्तव आहे. अशातच आता राष्ट्रवादीकडून सोलापूर लोकसभेच्या जागेवरही दावा करण्यात येत आहे. काँग्रेसने सोलापूर लोकसभा सलग दोन वेळा गमावल्यामुळे राष्ट्रवादी या जागेवर आपला दावा सांगत आहे. या मतदारसंघात काँग्रेस पुन्हा एकदा मुसंडी मारू शकते, अशी आशा पक्षातील नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना आहे. त्यामुळे ते सोलापूर लोकसभा लढवण्यावर ठामच आहेत.

मध्यंतरी रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लढवू शकतो, असे वक्तव्य केल्यानंतर आमदार प्रणिती शिंदे यांनी कोण रोहित पवार? असे म्हणत त्यांची खिल्ली उडवली होती. यावरून काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये पोस्टरवर चांगलेच रंगले होते. आता नुकत्याच शरद पवार यांच्या सोलापूर दौऱ्यात पुन्हा एकदा राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी सोलापूर लोकसभेवर दावा केला आहे. सुधीर खरटमल यांच्या रूपाने सोलापूर लोकसभा राष्ट्रवादीने लढवावी, अशी मागणी अनेक नेत्यांनी खासदार शरद पवार यांच्याकडे केली आहे. मात्र शरद पवार यांनी आताच याबाबत चर्चा नको नंतर सर्व नेत्यांची बैठक घेऊन निर्णय घेऊ असे सांगून सध्या तरी हा वाद टाळण्याचा प्रकार केला आहे.

दुसरीकडे पंढरपूर दौऱ्यावर आलेल्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातून माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीच निवडणूक लढवावी, असे वक्तव्य केले आहे. पटोले यांचे हे वक्तव्य म्हणजे सोलापूर लोकसभा ही काँग्रेसकडेच राहणार असल्याचे संकेत आहे. असे असताना राष्ट्रवादीकडून वारंवार काँग्रेसला डिवचण्याचे प्रकार होत आहेत.

### काँग्रेसमध्ये उमेदवाराबाबत संभ्रमावस्था

सोलापूर लोकसभा मतदारसंघ राखीव आहे. काँग्रेसकडून सुशीलकुमार शिंदे आणि आमदार प्रणिती शिंदे हे दोनच उमेदवार आहेत. या दोघांव्यतिरिक्त काँग्रेसकडे ताकतवान असा उमेदवार नाही. माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी यापुढे निवडणूक लढवणार नसल्याचे दोनवेळा जाहीर केले आहे तर दुसरीकडे आमदार प्रणिती शिंदे सध्यातरी लोकसभा निवडणूक लढवण्याच्या मानसिकतेमध्ये नाही. त्यामुळे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांपुढे मोठी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

### राष्ट्रवादीकडून खरटमल असू शकतात उमेदवार

सोलापूर लोकसभेवर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष अप्रत्यक्षपणे दावा सांगत आहेत. काँग्रेसमधून राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केलेले सुधीर खरटमल हे राष्ट्रवादीचे लोकसभेचे उमेदवार असण्याची शक्यता आहे.

### सोलापूरवर दावा सांगून राष्ट्रवादी पुणे घेणार?

शरद पवार यांनी जरी चांगल्या कामाची सुरुवात सोलापूर आणि कोल्हापूर मधून करतो, असे सांगितले असले तरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांचा पुणे जिल्ह्यावरही जिव्हाळा दिसून आला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे द्यावा ही मागणी पक्षाने गत निवडणुकीदरम्यानही केली होती. मात्र काँग्रेसने हा मतदारसंघ सोडला नाही. आता सोलापूर मतदारसंघ मागत काँग्रेसवर दबाव टाकायचा आणि ऐनवेळेला सोलापूरच्या बदल्यात पुणे लोकसभा मतदारसंघ घ्यायचा अशी खेळी राष्ट्रवादीची असल्याचे बोलले जात आहे.



## शहरातील ३ मलनिस्सारण केंद्रांची महापालिका आयुक्तांनी केली पाहणी

सुराज्य/सोलापूर

महापालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांनी आज महापालिकेच्या देगाव, प्रताप नगर तसेच कुमठे येथील मलनिस्सारण केंद्रास (एसटीपी) भेट देऊन पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कार्यकारी अभियंता तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता विजयकुमार राठोड, सहाय्यक अभियंता संतोष यलगुलवार, सहाय्यक अभियंता रामचंद्र पेंटर, राहुल शिंदे आदी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिकेचे देगाव येथे ७५ एमएलडी, प्रतापनगर येथे १५ एमएलडी व कुमठे या ठिकाणी १२.५ एमएलडी क्षमतेचे मलनिस्सारण केंद्र आहेत. या ठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार मलनिस्सारण केंद्रामध्ये सांड पाण्यावर प्रक्रिया करून दररोज मलनिसरण केंद्रामधील लॅबमध्ये सांडपाण्याची तपासणी करण्यात येते. त्याचबरोबर सोलापूर शहरातून येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ती नदी अथवा नाल्यात सोडली जाते,अशी माहिती आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

## पारधी समाजाची शनिवारी बैठक चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक सोलापूर येथील शिवस्मारक कार्यालयात दिनांक शुक्रवार १२ मे रोजी होणार आहे.





ही बैठक भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे यांच्या प्रमुख उपस्थित होत असल्याची माहिती आदिवासी पारधी समाज संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष राजेश काळे यांनी दिली.

शुक्रवारी साडेदहा वाजता ही बैठक आयोजित केली असून आहे. या बैठकीत पारधी समाजाच्या समस्या अडचणी व त्यांच्या मागणीवर चर्चासत्र होणार आहे. सर्व समाज बांधवांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक काळे यांनी केले आहे.

### काळे यांचा भाजप प्रवेश होणार का?

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमादरम्यान माजी उपमहापौर काळे यांचा भाजप प्रवेश होण्याची शक्यता आहे. मध्यंतरी त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आले होते. त्यांचे निलंबन आता मागे घेतले जाण्याची शक्यता वर्तवण्यात आले.



## महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचे महत्व आजच्या काळातही उपयुक्त : बसवलिंगेश्वर महास्वामी

सुराज्य/सोलापूर

श्रमास प्रतिष्ठा मिळण्यासाठी व समाजात शांतता निर्माण होण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचे महत्व आजच्या काळातही उपयुक्त आहे, असे बसवलिंगेश्वर महास्वामी यांनी सांगितले.

बसव सेंटर सोलापूर यांच्यावतीने मानद पदवीदान व सत्कार समारंभ दि. ७ मे रोजी लोकमान्य टिळक सभागृह(एम्पी थिएटर) सोलापूर येथे झाला.त्यावेळी ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी हे उपस्थित होते. प्रथमता महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे हस्ते झाले. सुवर्णलता तेलसंग यांचे वचन गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

बसव सेंटर हे समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या लोकांचा शोध घेऊन त्यांचा यथोचित गौरव व सन्मानित करण्याचे कार्य सचोटीने करत आहे, असे गौरवउद्गार डॉ. इरेश स्वामी यांनी याप्रसंगी काढले.

पुरस्काराचे मानकरी: बसवरत्न पुरस्कार प्रा. डॉ. श्रुती वडकबाळकर ,बसवतत्वश्री श्री मौलाली सय्यद (बाबा मिस्त्री), कायकयोगी म्हणून श्री विनोद करपेकर (सामाजिक कार्यकर्ता). बसवश्री म्हणून सिद्धाराम तुगावकर(सामाजिक कार्यकर्ता), आदर्श पत्रकार म्हणून प्रमिला चोरगी, आदर्श संस्था म्हणून संस्कार भारतीचे अनंत देशपांडे या सर्वांना त्यांच्या केलेल्या उल्लेखनीय कामासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात वचन पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांचे श्री बसवलिंगेश्वर स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

बसव सेंटरचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. कार्याध्यक्ष बाबासाहेब कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. निळकंठ कोनापुरे, प्रा. मल्लिनाथ पाटील, मंगलाताई कोनापुरे, ताराबाई कोनापुरे, लीलावती मडकी, पुष्पाताई गुंगे उपस्थित होते . गौरीशंकर कोनापुरे, सुभाष कुलकर्णी, विजयालक्ष्मी नागा, सपना कुलकर्णी, पौर्णिमा तोंटद या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## आ. शहाजीबापूंनी आपल्या मर्यादा ओळखाव्यात: प्रा. कुलकर्णी



सोलापूर : आ. शहाजी बापू पाटील यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर केलेल्या टिकेवरप्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी उत्तर दिले आहे. आ. पाटील यांनी आपल्या मर्यादा ओळखाव्यात असे त्यांनी म्हटले आहे.

आ. पाटील यांना ज्या शिवसेनेने आणि काँग्रेसने आमदार केलं त्याच्यावर टीका करतात. उद्या सरकार गेल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका करायला ते कमी करणार नाही. नाना पटोले प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून ते आजपर्यंत पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी काम केले आहे. अशा नेत्यावर टीका करणे म्हणजे सूर्यावर थूंकण्यासारखे आहे. असे कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

## अंजनगाव येथे आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : अंजनगाव (ता.माढा) येथे राहणाऱ्या बबन पांडुरंग वाघमोडे (वय १९) या तरुणाने स्वतःच्या शेतात विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सोमवारी दुपारी हा प्रकार घडल्यानंतर त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून समाधान (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## मसरी चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद

सुराज्य/सोलापूर

मसरी हा मराठी चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला सर्व स्तरातील प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळत असून सर्व चित्रपटगृहात मसरी ला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

कॅन्जरस प्रॉडक्शन्स प्रस्तुत,डॉ. सुरेश नागपाल,आकाश नागपाल निर्मित या चित्रपटाचे लेखन,संकलन आणि दिग्दर्शन अशोका के.एस.यांनी केले असून दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील नामवंत दिग्दर्शक अशोका के. एस.आणि अभिनेता पृथ्वी अंबर मसरीफच्या निमित्ताने मराठीत पदार्पण केले आहे.या चित्रपटाचे संगीत मकांताराफ चित्रपटाला ज्याचं संगीत लाभलं आहे.

## औज येथे पैशासाठी मारहाण; दोन विवाहित महिला जखमी

सुराज्य/सोलापूर

औज (ता.दक्षिण सोलापूर) येथे माहेरकडून पैसे आण म्हणून दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत प्रतीक्षा रविकांत घायगोडे (वय २२) आणि प्राजक्ता उमाकांत घायगोडे (वय २४ दोघी रा. औज) अशी जखमींची नावे आहेत . काल रात्री नऊ वाजेच्या सुमारास दोघींना त्यांचे पती रविकांत घायगोळे आणि उमाकांत घायगोडे तसेच अन्य दोघांनी मिळून मारहाण केली . त्यांना जखमी अवस्थेत शंकर (वडील) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले . या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

**न्यूतिऱ्हेगाव येथे लोखंडी कड्याने मारहाण**

फॉरेस्ट परिसरातील न्यूतिऱ्हेगाव येथे राहणाऱ्या अनिकेत विजय चव्हाण (वय २१) याला विनाकारण बांबू, हातातील लोखंडी कडा आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले . ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास त्याच्या घराजवळ घडली. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. संतोष गायकवाड, अभिषेक कांबळे आणि इतर चार जणांनी त्याला मारहाण केली. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

**मोहोळ येथील जखमीचा मृत्यू**

मोहोळ येथील यशोदा लॉज मध्ये जखमी आणि बेशुद्ध अवस्थेत आढळलेला गणेश आदमिले (वय ३८रा.माहित नाही ) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी सकाळी मयत झाला.

तो रविवारी रात्रीच्या सुमारास मोहोळ येथील यशोदा लॉजमध्ये जखमी अवस्थेत आढळला होता. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून म्बुलन्स मधुन सोलापूरात दाखल करण्यात आले होते. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**शिवणी येथे काठीने मारहाण**

शिवणी (ता.उत्तर सोलापूर) येथे काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत संदीप भारत पवार (वय ३२) हा जखमी झाला ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास शिवणी येथील गावात घडली.

तो दूध देण्यासाठी गावात गेला होता. त्यावेळी किरण तानाजी गुंड त्याचा भाऊ प्रवीण गुंड आणि इतर सहा जणांनी मिळून त्याला मारहाण केली. अंकुश पवार (काका) यांनी त्याला शासकिय रुग्णालयात दाखल केले .या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## 'अवकाळी'मुळे यंदाचा मान्सून लांबण्याची शक्यता

सुराज्य/सोलापूर

यंदाच्या वर्षी ऐन उन्हाळ्यातच सतत अवकाळी पाऊस पडत असल्याने त्याचा परिणाम यावर्षी येणाऱ्या मान्सूनच्या प्रवासावर होण्याची भीती हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. यदाकदा मान्सूनचा प्रवास थांबला तर देशावर अवर्षण स्थितीचे संकट ओढवू शकते. त्याचा विचार करून कृषी खात्याने खरीप पेरण्यांच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना प्रबोधन करण्याची गरज आहे.

पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडवली आहे.एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापासून ते मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सातत्याने अवकाळी पाऊस पडत आहे.त्याचा दणका सोलापूर जिल्ह्यालाही बसला.या अवकाळी स्थितीविषयी हवामान तज्ज्ञांनी केलेले संशोधन समोर आले असून त्याचा परिणाम यंदाच्या मान्सूनवर होईल,असे हे तज्ज्ञ सांगतात. भारताचा बहुतांश भूभाग उन्हाळ्यात तापण्याऐवजी थंड होण्याचा कल असेल. म्हणजेच यंदा होतंय त्यानुसार जमीन आणि समुद्र यांच्यातील तापमानाचे प्रवण कमी झाल्याचे तज्ज्ञ सांगतात. आहे. साधारणतः भारतात मान्सून केरळमध्ये १ जूनला दाखल होतो. भारतात मार्च ते मे हा मान्सून पूर्व कालावधी आहे. हा काळ नैऋत्य मोसमी पावसाच्या निर्मितीसाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा असतो', असे हवामान तज्ज्ञ डॉ. एम. राजीवन यांनी म्हटले आहे.

### 'मोचा'च्या परिणाम

यंदाच्या वर्षातील पहिले चक्रीवादळ 'मोचा' हे बंगालच्या उपसागरात तयार होत असून, ते म्यानमारच्या दिशेने पुढे सरकून म्यानमार येथेच जमिनीवर धडकण्याची शक्यता आहे. सध्या राज्यात वारा खंडित प्रणालीमुळे मेघगर्जनेसह पावसाचे वातावरण असल्याने चक्रीवादळामुळे या पावसात भर पडण्याच्या चर्चांना सोशल मीडियावर ऊत आला आहे. मात्र राज्याला या चक्रीवादळाचा धोका नाही, असे प्रादेशिक हवामान विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. वारा खंडित प्रणालीमुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, वाशिम, यवतमाळ येथे मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता.

### खरीप हंगामाचे वेध...

सोलापूर जिल्ह्याला खरीप हंगामाचे वेध लागले आहेत.२५ मे रोजी रोहिणी नक्षत्राचे आगमन होते.या नक्षत्राचा समाधानकारक पाऊस पडल्यास शेतकरी खरीपाच्या पेरण्या उरकून घेत असतो.मान्सूनच्या प्रवासाबाबत अनिश्चितता व्यक्त झाल्यामुळे शेतकरी वर्गाला ताकही फुकूंन प्यावे लागणार आहे.कारण एक-दोन पाऊस पडल्यानंतर शेतकरी पेरण्यांची घाई करतात आणि पुढे पावसाने ओढ दिल्यास हा पेरा वाया जातो.पेरण्यांवर केलेला खर्चही पाण्यात जातो. शेतकऱ्यांना फटका बसतो तो इथेच.त्यामुळे पावसाचा अंदाज पाहूनच पेरण्या करण्याची आवश्यकता आहे.दर तीन वर्षांनी अशी परिस्थती उद्भवत असते.अवकाळी पाऊस पडला की नक्षत्रांचा पाऊस लांबला जातो,हा आतापर्यंतचा अनुभव असल्याचे जाणकार शेतकरी सांगतात.त्यासाठी कृषी खात्याकडून खरीप हंगामाच्या जेव्हा आढावा बैठका होतात,त्यात शेतकऱ्यांना याविषयी मार्गदर्शन करण्याची गरज आहे.


### जाहीरातीचा नमुना

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर आस्थापनेवरील मोटार परिवहन विभागातील शासकीय वाहनांच्या नमुद साईजचे टायर-ट्यूब्ज खरेदी करण्याकरिता सन २०२३-२०२४ या कालावधीकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहेत. इच्छुक व्यावसायिक यांनी उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने अधिक माहितीसाठी या कार्यालयाचे खालील नमुद संकेतस्थळावर भेट द्यावी.

WWW.Solapurcitypolice.in याच संकेतस्थळावर दि.०८/०५/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून सदरची दरपत्रके **आवक शाखा, सोलापूर शहर यांचेकडे सही व शिक्का/ सिलसह दि.२३/०५/२०२३ रोजी ५.०० वापर्यंत समक्ष द्याव्यात.** प्राप्त दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पोलीस उपआयुक्त (मुख्या.) यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक नाकारल्याबाबत कोणताही पत्रव्यहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मा.पोलीस आयुक्त,**
**यांचे मान्यतेने.**

शिक्का

**सही/-**
**(अजित बोऱ्हाडे)**
**पोलीस उप-आयुक्त, (मुख्या)**
**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे करीता.**

**विमाका-पुणे-जाहि/४८/२०२३-२४**



## घरफोडीतील विधी संघर्षग्रस्त बालकाकडून दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर** : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून घरफोडी करणाऱ्या विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन पाच गुन्हे उघडकीस आणून १ लाख ४० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने व सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पेटकर,पोसई विक्रम रजपूत यांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत्या घरफोडीचे प्रमाण लक्षात घेऊन घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध घेताना विक्रम रजपूत यांना जुना विडी घरकुल येथील एक इसम चोरी केलेले सोन्या-चांदीचे दागिने विक्री करिता राजेश पायलट चौक येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यावेळी विक्रम रजपूत यांनी त्यांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार असे सर्वजण मिळून राजेश पायलट चौक जुना विडी घरकुल येथे थांबले असता,एक इसम रस्त्याने चालत येत असल्याचे दिसून आले. त्यावेळी त्या इसमास ताब्यात घेऊन चौकशी केली असता,तो विधी संघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. त्या बालकास विश्वासात घेऊन चौकशी करून त्याच्याकडुन एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण पाच गुन्हे उघडकीस आणून १ लाख ४० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने,पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पेटकर, पोसई विक्रम रजपूत,पोलीस हेडकॉन्स्टेबल राकेश पाटील,सचिन भांगे, पोलीस नाईक मंगेश गायकवाड, काशिनाथ वाघे, शंकर याळगी, अश्रूभान दुधाळ,सुरज पवार, सुभाष अर्जुन, सय्यद यांनी बजावली.

## दुधाचे कॅरेट देण्याच्या कारणावरून तरुणाच्या डोक्यात घातले कॅरेट

**सोलापूर** : फिर्यादी सुभाष शंकर गंगदे (वय-२०,रा. संगमेश्वर नगर) हा गणेश नगर जुना विडी घरकुल सोलापूर येथे सार्वजनिक रोडवर दूध कॅरेट देत असताना, उमेश इंगळे व त्याचा भाऊ यांनी फिर्यादी सुभाष याचा मित्र महेंद्र गायकवाड याला उद्यापासून दूध लवकर देत जा असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी याने वरील संशयित आरोपी यांना शिवीगाळ करू नका उद्यापासून दूध लवकर देतो असे म्हणत असताना,उमेश इंगळे याने धक्का मारून लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर उमेश इंगळे यांचा भाऊ पाठीमागून येऊन गाडी मधील कॅरेट हातात घेऊन फिर्यादी सुभाष याच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.अशा आशयाची फिर्याद सुभाष गंगदे याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्याच्या फिर्यादीवरून उमेश इंगळे व त्याचा भाऊ या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि.९ मे रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास गणेश नगर जुना विडी घरकुल येथे घडली. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

## गुंजेगाव येथे विवाहितेच्या वडिलास मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा


**सोलापूर** : माझ्या मुलीला विनाकारण शिवीगाळ आणि धमकी का देता? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत बाबा लक्ष्मण सखदे आणि त्यांची मुलगी पायल कदम हे दोघे जखमी झाले. ही घटना गुंजेगाव (ता.मंगळवेढा) येथे आरोपीच्या घरासमोर रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी सुरेखा राजू वाघमारे, तिचा पती राजू महादेव वाघमारे आणि अमर कदम (सर्व रा.गुंजेगाव) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. बाबा सरवदे यांनी मुलीच्या घरी जाऊ तिला विनाकारण का त्रास देता, असे विचारले होते. त्यावेळी तिघांनी तू कोण? असे म्हणत त्यांना दगड आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली . मुलगी पायल ही भांडण सोडविण्यास आली असता तिला देखील मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार विभुते पुढील तपास करीत आहेत.

## दुधनी येथे महिलेस काठीने मारहाण

**सोलापूर** : दुधनी (ता.अक्कलकोट) येथे हातउसने दिलेले पैसे मागितल्याच्या कारणावरून काठी आणि हाताने केलेल्या मारहाणीत सुनिता मल्लिकार्जुन दोडमनी (वय ३४, रा. दुधनी) या जखमी झाल्या. ही घटना काल सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी अनिल अशोक दोडमणी (रा. दुधनी) याच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला. हवालदार कोळी पुढील तपास करीत आहेत.

## स्वामींवर श्रद्धा आणि माझ्यावर प्रेम असंच कायम असुद्या : मुडावदकर

### मालिकेचे ७५० हून अधिक भाग पूर्ण



**सोलापूर** : कलर्स मराठी वरील जय जय स्वामी समर्थ या मालिकेला संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या बाहेरून देखील रसिक प्रेक्षकांचे उदंड प्रेम लाभत आहे.मालिकेचे ७५० हून अधिक भाग आता पूर्ण झाले आहेत त्यानिमित्ताने अक्षय मुडावदकर (स्वामी समर्थ) यांनी आपला प्रवास सांगितला.मालिकेच्या प्रवासाबद्दल आणि अनुभवा बद्दल काय सांगाल? ७५० हून अधिक भाग,२.५ वर्षांचा प्रवास,अगणित अनुभव,मोठ्यांचे आशीर्वाद,लहानंच प्रेम..आणि स्वामी आजोबा म्हणून येणारी हाक.कधी स्वप्नात सुद्धा विचार नव्हता केला की आपल्या वाट्याला हे सगळं येईल.खूप काही शिकलो मी ह्या प्रवासात.आणि एक माणूस म्हणून स्वतःला बदलण्याची एक संधी शोधू लागलो. खरतर अक्कलकोट ला गेल्यावर मला शांत बसून राहायला खूप आवडतं.स्वामी म्हणतात कि हम गया नहीं जिंदा है आणि खरंच हा अनुभव अक्कलकोट ला गेल्यावर मिळतो.स्वामी अजूनही तिथेच आहेत हे जाणवतं. पहिली मालिका आणि स्वामी साकारायला मिळणं काय सांगाल ? आज माझ्या करिअरची सुरुवात साक्षात स्वामींच्या भूमिकेने व्हावी हा खरंतर मी माझ्या पुढील प्रवासा करिता मिळालेला स्वामींचा आशीर्वाद समजतो.तेव्हा स्वामींवर श्रद्धा आणि माझ्यावर प्रेम असंच कायम असुद्या.

# योग दिनाला साडेपाच हजार योग साधक सहभाग घेणार : अळ्ळीमोरे

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूर जिल्हा पतंजली योग समिती, भारत स्वाभिमान, पतंजली योग समिती, महिला पतंजली योग समिती, युवा भारत, किसान सेवा समिती या पाच संघटनांच्या माध्यमातून संपूर्ण सोलापूर जिल्हा मध्ये ७६ निशुल्क दैनिक योग वर्ग चालतात. यापैकी सोलापूर शहरांमध्ये ४६ दैनिक योग वर्ग विविध ठिकाणी चालतात. येत्या ९ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाला साडेपाच हजार योग साधक सहभाग घेणार असल्याचे प्रतिपादन पतंजली योग पीठ हरिद्वारच्या केंद्रीय महिला प्रभारी तथा वरिष्ठ महाराष्ट्र राज्य प्रभारी सुधा अळ्ळीमोरे यांनी केले.**



२१ जून रोजी होणाऱ्या ९ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ४३ दिवस बाकी असल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि पतंजली योग समिती सोलापूर यांचे सयुंक्त विद्यमाने आज सकाळी ६ ते ७:३० वाजता जुळे सोलापूर येथील ए.डी.जोशी शाळेच्या प्रांगणात आयोजित प्रथमेश प्राणायाम योग वर्गाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर भारत सरकारचे क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी अंकुश चव्हाण, सहायक क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, भारत स्वाभिमान संघटनेचे जिल्हा प्रभारी सुरेंद्र पिसे, पतंजली जिल्हा कोषाध्यक्ष रघुनंदन भुतडा, पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी विशाल गायकवाड,महिला पतंजली योग समितीच्या जिल्हा प्रभारी सुजाता शास्त्री, युवा भारत संघटनेचे जिल्हा अध्यक्ष मोहन कुंभार, किसान सेवा समितीचे जिल्हा अध्यक्ष बनसोडे आणि नगरसेविका संगीता जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती अळळीमोरे म्हणाल्या की, निशुल्क योग वर्गाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यामध्ये हजारो वृद्ध, महिला, युवक आणि लहान मुले योगाचे धडे घेऊन आपले आरोग्य सांभाळतात. पतंजली योगशिक्षकाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात योगाचा प्रचार आणि प्रसार केला जातो आहे. योगाचे धडे देण्याबरोबरच आयुर्वेद, भारतीय संस्कृतीचे महत्त्व, स्वदेशीचे महत्व, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर ही समाज उपयोगी कार्य ही पतंजली परिवाराच्या माध्यमातून करण्यात येतात.

श्री चव्हाण यांनी जिल्हा प्रशासन आणि केंद्रिय संचार ब्युरोच्या वतीने जिल्हास्तरीय ९व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजनाबाबत माहिती दिली आणि योग दिनाला मोठ्या प्रमाणत सहपरिवार सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा मल्लिकार्जुन भरमशेट्टी आणि आभार परबतराव ताई यांनी केले. स्वागत गीत व योगाचे प्रात्यक्षिक संजवाड दक्षिण सोलापुरच्या सरपंच सौ सुजाता सुतार (शास्त्री) यांनी गायले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथमेश वर्गाचे योग गुरू मल्लिनाथ आतनुरे, रक्षिता प्राणायाम वर्गाच्या मंगल शेळके, शिवगुंडे, सत्तुबार, शिंदे, चव्हाण, कुलकर्णी, निंबरगी, लोढे आणि सौ ढवणे यांनी घेतले.

# विद्यार्थ्यांनी यशाबरोबरच अपयशही पचवायला हवे : डॉ.कामत

**सुराज्य/सोलापूर**



आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर होण्यासाठी अथक प्रयत्न केले पाहिजे. आणि आपल्या यशाबरोबरच अपयशही पचवायला शिकले पाहिजे. असे प्रतिपादन डॉ.होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबईचे कुलगुरू तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी.शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या १५ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त प्रा. भिमाशंकर शेटे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही.बी. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय सुत्रावे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ.कामत आपल्या भाषणात पुढे म्हणाले की या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या सॉफ्ट स्किल ला महत्त्व येणार आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास हा चार टप्प्याने होत असतो. ते म्हणजे बुद्धिमान, भावनिक, संघभावना, लवचिकता या चारही टप्प्यांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रगती करणे आवश्यक आहे. याबरोबरच विज्ञानाच्या, संशोधनाच्या क्षेत्रातील न्यूटन, स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकेरबर्ग, बील गेट्स यांची विविध उदाहरणे त्यांनी दिली. विज्ञानामध्ये नवनवीन संशोधन होणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात संस्थेचा इतिहास हा संघर्षाचा असल्याचे सांगितले अगदी थोडया विद्यार्थी संख्येने महाविद्यालयाची सुरुवात करून संस्था आज यशस्वीरित्या पुढील वाटचाल करीत असल्याचे सांगून त्यांनी सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या पारितोषिक वितरण समारंभात ९ प्राध्यापक व ८५ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच सोहन क्षीरसागर या विद्यार्थ्यांस व्ही.जी.एस.स्टार हा किताब देण्यात आला.

प्राचार्य डॉ.दत्तात्रय सुत्रावे यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.गोपिका मंजुनाथ यांनी करून दिला. पुरस्कारांचे यादी वाचन समन्वयक प्रा.एम.बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे-शिवपूजे व प्रा.सायली फाटक यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.अनमोल वळसंगे यांनी केले.

याप्रसंगी डॉ.व्यंकटेश गंभीर, डॉ. एस.के.पवार, डॉ.श्रीकांत येळेगावकर, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन प्रकाश वाले, सुभाष मुनाळे, नरेंद्र गंभीरे, डॉ.सिद्धेश्वर वाले, शिवानंद कोनापूरे, डॉ.राजाभाऊ ढेपे, डॉ. देसाई, डॉ.गोटे , डॉ. कीर्ती पांडे, डॉ. बी.एन.कांबळे. पद्माकर कुलकर्णी, राजशेखर बुरकुले, डॉ. आर. वाय, पाटील, डॉ. कापसे, श्रुती गायकवाड, अंजली तिवारी उपस्थित होते.




## घरासमोर लावलेली दुचाकी पळवली

**सुराज्य/सोलापूर**

घरासमोर लावलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीबी.०३९६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना ५ ते ६ मे ए ग्रुप विडी घरकुल हैदराबाद रोड येथे घडली. याप्रकरणी नरसिंग रामदास सारंगी (वय-५२,रा.ए ग्रुप विडी घरकुल, हैदराबाद रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

# महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्यपदी रतनसिंह रजपूत यांची निवड

**सुराज्य/श्रीपूर**



श्रीपुर तालुका माळशिरस येथील मोहिते पाटील परिवाराचे एकनिष्ठ कार्यकर्ते व भाजपाचे सदस्य रतनसिंह रजपूत यांची महाळुंग श्रीपुर नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्य पदी निवड करण्यात आली आहे.

सदर निवडीचे पत्र महाळूंग श्रीपुर नगर पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांच्या उपस्थितीत अकलूज प्रांत अधिकारी टिळेकर यांच्या हस्ते स्वीकृत सदस्य पदाचे पत्र रतन सिंह राजपूत यांना देण्यात आले.

रतनसिंह रजपूत व रजपूत परिवार हे गेली अनेक वर्षापासून विधान परिषदेचे आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील व भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीपुर येथे भाजपाचे काम व सामाजिक क्षेत्रातही कार्यरत आहेत.

पूर्वी त्यांचे बंधू कै. अनिल सिंह रजपूत यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक वर्ष सलग सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत होते. कै. अनिल सिंह रजपूत यांनी विजय प्रताप युवा मंचच्या माध्यमातून युवा तरुणांचे संघटन करून विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवून या माध्यमातून मोहिते पाटील यांचे विचार सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. अनिलसिंह रजपूत यांच्या निधनानंतर त्यांच्या पाठीमागे नूतन नगरसेवक रतनसिंह रजपूत यांनी तोच वारसा पुढे चालू ठेवून मोहिते पाटील घराण्याची एकनिष्ठ राहून मोहिते पाटील यांचे कार्य व विचार पुढे नेण्याचे काम करत आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करून मोहिते पाटील परिवार व महाळुंग येथील भाजपाचे स्थानिक नेते यांच्यावतीने रतन सिंह राजपूत यांच्या नावाची शिफारस होऊन त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाली आहे. रतनसिंह रजपूत यांची निवड झाल्याची वार्ता श्रीपुर परिसरात समजताच भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी करून गुलालाची मुक्त उधळण करुन आनंदोत्सव साजरा केला. रतनसिंह रजपूत हे श्रीपूर येथे येताच अनेकांनी त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> स द र माजी महाळुंग श्रीपुर नगरपंचायतीवर स्वीकृत सदस्यपदी निवड ही रजपूत परिवाराने मोहिते पाटील परिवाराच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहून केलेल्या कामामुळेच व महाळुंग येथील स्थानिक नेत्यांच्या सहकार्यामुळेच मला नगरसेवक पदावर नगरपंचायत मध्ये काम करण्याची संधी मिळाली.
>
> **-रतनसिंह रजपूत** स्वीकृत सदस्य महाळुंग श्रीपूर नगरपंचायत.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुणाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : मैत्रिणीकडे अभ्यासाला जाताना १२ वर्षीय मुलीचा पिच्छा करत तू मला आवडते असे म्हणत, तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी शहारुख शेख (रा. सोलापूर) याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.पीडित मुलगी ही १२ वर्षाची असून तिने नुकतेच सहावीची परीक्षा दिली आहे. ती अभ्यासासाठी आपल्या मैत्रिणीकडे जात असताना तिला ८ मे रोजी दुपारी आरोपी शहारुख हा तिचा पाठलाग करू लागला.शिवाय तिला रस्त्यात आडवून मला तुला बोलायचे आहे,असे म्हणाला. शिवाय आरोपी हा पीडितेचा पाठलाग करत होता. हि घटना पीडितेने घरी आल्यानंतर आईला सांगितली. याप्रकरणी पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## गोडबोले, तांबोळी यांना मसाप जीवनगौरव

**सुराज्य/पुणे**

### प्रा.डॉ.शमसुद्दीन तांबोळी यांना डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार जाहीर





महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि लेखिका डॉ. अंजली सोमण पुरस्कृत ममसाप जीवनगौरवफ पुरस्कार ज्येष्ठ लेखक अच्युत गोडबोले यांना जाहीर झाला आहे. २५,०००/- रु. आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मसापचा मडॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कारफ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांना जाहीर झाला असून ११,०००/- रु. आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हे पुरस्कार मसापच्या २७ मे रोजी होणाऱ्या वर्धापनदिन समारंभात परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. विवेक सावंत यांच्या हस्ते आणि मसापचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात येणार आहेत. परिषदेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, विश्वस्त यशवंतराव गडाख, उपाध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे, राजीव बर्वे आणि विद्याधर अनास्कर यावेळी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

उत्तम लेखक असलेले मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी साहित्य चळवळीतून धार्मिक सुसंवाद, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता यासाठी विविधांगी प्रयत्न करून समाजजागरण केले आहे. मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे ते संपादक आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करताना परिषदेला समाधान वाटत आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती : डॉ. येळेगावकर

### रयत शिक्षण संकुलाच्या वतीने कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**सुराज्य/सोलापूर**



कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केल्यामुळे वंचित आणि उपेक्षित समाजातील मुला मुलींना शिक्षण मिळाले. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यांची कमवा व शिका ही योजना जगभरातील विद्यार्थ्यांनी स्वीकारली. त्यातून श्रमाला प्रतिष्ठा मिळाली. हे त्यांचे सामाजिक योगदान उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.

सम्राट चौकातील रयत शिक्षण संकुलाच्यावतीने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६४ व्या पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर आयोजित अभिवादन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मनपा उपायुक्त मच्छिंद्र घोलप होते.

याप्रसंगी आनंददादा चंदनशिवे, केतनभाई शहा, प्रख्यात कर सल्लागार धीरज जवळकर, प्राचार्य डॉ सुरेश पवार, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर, उद्योजक शशिकांत पाटील, इंद्रमल जैन, हर्षल कोठारी, गणेश पुजारी, डॉ. अस्मिता बालगावकर उपस्थित होते.

> **रयत शिक्षण संस्थेची त्यागातून उभारणी : उपायुक्त घोलप**
>
> कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांची पत्नी लक्ष्मीबाई यांच्याजवळील सोन्याचे दागिने मोडून बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. पाटील कुटुंबीयांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्थेची उभारणी झाली आहे असे मत मनपा उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी व्यक्त केले.

पुढे ते म्हणाले की कर्मवीरांच्या स्वावलंबी शिक्षण प्रणालीमुळे बहुजन समाजातील विद्यार्थी विद्यार्थ्यांना शहाणपण प्राप्त झाले. त्यांनी प्रशासकीय सेवेत उच्च अधिकार पदे भूषविली. हीच खऱ्या अर्थाने कर्मवीरांच्या कार्याची पोहोच पावती आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत नागणे यांनी केले. यावेळी मधुकर श्रीवास्तव, चंद्रकांत घुले, राहुल कांबळे, रामचंद्र हक्के, भारत केत, काशीबाई ढेरे, डॉ. विजय रेवजे, डॉ. मोहन चव्हाण, भक्तराज जाधव, अमर देशमुख, प्रतिभा भोसले, कल्पना सर्वगोड, मीनाक्षी बिराजदार आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी किशोर मार्तंडे महावीर आळंदकर, सुनीता पाटील, नियाज शेख यांनी प्रयत्न केले.

# चुलत्याचा त्रास, तरुणाची आत्महत्या

## मोहोळ तालुक्यातील गलंदवाडी येथील प्रकार

✔ सुराज्य/मोहोळ

मागील दोन वर्षापासून चुलत्या कडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून पुतण्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मोहोळ तालुक्यातील गलंदवाडी येथे घडली.

मला व माझ्या दोन्ही मुलांना विनाकारण रस्त्यामध्ये अडवून माझाच भाऊ दिनकर बिरुदेव ढेरे हा शिवीगाळ दमदाटी करून मारहाण करण्याची धमकी देत मानसिक व शारीरिक त्रास देत होता. त्याच्याच त्रासाला कंटाळून माझा मुलगा महेश संजय ढेरे याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची फिर्याद मृत मुलाच्या वडिलांनी दाखल केली आहे

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय बिरुदेव ढेरे (रा. गलंदवाडी ता.मोहोळ) हे राहुल व महेश या दोन्ही मुलांसमवेत राहत असून त्यांनी बोपले येथे दाईंगडे यांची शेती बटईने करण्यासाठी घेतलेली आहे. मागील दोन वर्षांपूर्वी दिनकर ढेरे याचा मुलगा नवनाथ हा त्याच्या शेतातील मोटारीच्या बोर्डला शॉक लागून मयत झाला होता. त्यामध्ये त्याने राहुल याचे नाव घेतले होते. त्या वेळेपासून दोघा भावांमधील बोलणे बंद झाले होते. दिनकर ढेरे भाऊ आणि पुतण्यांना मानसिक व शारीरिक त्रास देत होता. शेतात कामाला गेल्यानंतर मारहाण करण्यासाठी कोयता घेऊन अंगावर धावून येत होता. काकाच्या जाचाला कंटाळून राहुल हा गेल्या आठ महिन्यांपासून गाव सोडून बाहेर



गेला होता. त्याला ३ मे रोजी मोहोळ पोलिसांनी अटक केली होती. तेव्हापासून दिनकर ढेरे हा वेळोवेळी फिर्यादीच्या समोर येऊन तुमची मस्ती जिरवली की नाही? तुम्ही कसे गावांमध्ये राहता? आता तुम्हाला पण सोडणार नाही? असे म्हणत होता.

महेश याला शेतातील रस्त्यामध्ये एकटयाला गाटुन दिनकर ढेरे याने दमदाटी करून तू परत शेतामध्ये दिसला तर मी तुझे काहीतरी बरे वाईट करेन, अशी धमकी दिली होती. त्या त्रासाला कंटाळून मुलगा महेश याने ९ मे रोजी पहाटे आत्महत्या केली अशी फिर्याद दिली आहे. दिनकर बिरूदेव ढेरे (रा. गलंदवाडी ता. मोहोळ) याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

### चिट्ठीत नावे लिहून आत्महत्या?

दरम्यान मृत महेशच्या खिशात एक चिट्ठी आढळली असून त्याच्यामध्ये त्याने दिनकर बिरुदेव ढेरे व मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव घातले असून त्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. ती चिट्ठी पोलिसांनी जप्त केली आहे, अशी माहिती नातेवाईकांनी पत्रकारांना दिली.

---

### चिट्ठीचा तपास सुरू

सदर मृताच्या खिशामध्ये आढळलेल्या चिट्टीबाबत सखोल तपास करून पूढील कारवाई करण्यात येईल.

**– विनोद घुगे, पोलीस निरीक्षक**

# ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा ऐतिहासिक; दिव्या कांकरन

## अकलूजकरांनी नेटके नियोजन केल्याच्या भावना केल्या व्यक्त

✔ सुराज्य/अकलूज

मी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कुस्ती खेळले . पण या सर्व कुस्त्या शहरी भागात झाल्या. अकलूजकरांनी ऑलिंपिकच्या धर्तीवर महिला केसरी कुस्ती स्पर्धेचे नेटके आयोजन केले. हा महिलांसाठी मोठा सन्मान आहे. माझ्यासाठी व मुलींसाठी ही स्पर्धा ऐतिहासिक आहे. या स्पर्धे तून आंतरराष्ट्रीयस्तरावरील मल्ल घडतील, अशी अपेक्षा व्यक्त करून ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धेची पहिली मानकरी ठरलेल्या दिव्या कांकरन हिने शिवरत्न व ताराराणी महिला कुस्ती केंद्राचे कौतुक केले.



दिव्या काकरन ही भारतातील फ्रीस्टाइल कुस्तीपटू आहे. दिव्याने दिल्ली राज्य चॅम्पियनशिपमध्ये १७ सुवर्ण पदकांसह ६० पदके जिंकली आहेत आणि आठ वेळा भारत केसरी विजेतेपद जिंकले आहेत. २०२२ बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्समध्ये तिने महिलांच्या ६८ किलो फ्रीस्टाइल कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकल . २०20 टोकियो ऑलिम्पिकमध्ये नायजेरियाला रौप्यपदक विजेत्या आफ्रिकन चॅम्पियन ब्लेसिंगकडून पराभव पत्करावा लागला . २०१८ भारत केसरी दंगल २३ मार्च रोजी हरियाणातील भिवानी येथे आयोजित भारत केसरी विजेतेपद काकरनने जिंकले. या अंतिम सामन्यापूर्वी काकरनने आंतरराष्ट्रीय चॅम्पियन गीता फोगटचा पराभव केला होता . जकार्ता , पालेमबांग येथे २०१८ आशियाई खेळांमध्ये काक्रानने कांस्यपदक जिंकले आणि पालेमबांग येथील २०१८ आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या फ्रीस्टाइल ६८ किलो गटात कांस्यपदकही जिंकले . काकरनने २०१७ च्या राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले . २०१७ आशियाई कुस्ती चॅम्पियनशिपमध्ये, काकरनने महिलांच्या फ्रीस्टाइल ६९ किलो स्पर्धेत रौप्य पदक जिंकले . तिच्या खराब आर्थिक स्थितीबद्दल सरकारला पत्र लिहूनही , २०१८ मध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेत तिला दिल्ली सरकारकडून पाठिंबा मिळाला नाही , ज्यासाठी ती खूप चर्चेत होती. दिव्या सध्या भारतीय रेल्वेमध्ये वरिष्ठ तिकिट परीक्षक म्हणून काम करत आहे.




## भाजपच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी ॲड.गजानन भाकरे यांची निवड

✔ **सांगोला** : भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारिणीच्या निमंत्रित सदस्यपदी माजी नगरसेवक ॲड.गजानन लक्ष्मण भाकरे यांची निवड भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी केली. त्यानिमित्त माजी नगरसेवक सतीश सावंत कुटुंबीयांच्या वतीने राज्याचे माजी सहकार मंत्री आम.सुभाषबापू देशमुख यांच्या हस्ते ॲड. गजानन भाकरे यांचा फेटा बांधून व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. माजी नगरसेवक ॲड.गजानन भाकरे हे माजी मंत्री तथा आम. सुभाषबापू देशमुख यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी नगरसेवक म्हणून व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही अतिशय उत्कृष्ट काम केले आहे. माजी नगरसेवक ॲड. गजानन भाकरे यांच्या या निवडीनिमित्त आमदार सुभाषबापू देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी माजी नगरसेवक सतीश सावंत, हाजी हमीद तय्यब खतीब,प्राचार्य सर्फराज खतीब,ॲड. धनंजय लिगाडे,धनाजी महांकाळ यांच्यासह इतर मान्यवर नागरिक उपस्थित होते.

## नगर परिषदेवर हलगी मोर्चा काढण्याचा इशारा

✔ **सांगोला** : सांगोला शहरातील २०० हून अधिक हात गाडी, टपरी धारक, फळ व भाजी विक्रेते आहेत त्यांचा व्यवसाय हटविल्यास नगर परिषदेवर हलगी मोर्चा व गेट बंद आंदोलन करू असा इशारा मुख्याधिकारी डॉक्टर सुधीर गवळी यांना माजी नगरसेवक सुरज बनसोडे व हातगाडी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत लिगाडे यांनी आज नगरपालिकेला निवेदन दिले. आज रोजी सकाळी अंबिका देवी मंदिरात २०० हून अधिक छोट्या व्यवसायिकांची बैठक करण्यात आली होती त्या बैठकीत संघर्ष समितीचे नेते नागेश जोशी माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार माजी नगरसेवक सुरज बनसोडे शिवसेनेचे तुषार इंगळे व्यापारी संघटनेचे संजय गव्हाणे माजी उपनगराध्यक्ष अरुण बिले आदींनी बैठकीत भाग घेऊन जर छोटे व्यवसायिकांचे व्यवसाय हटविल्यास तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. आंदोलनकर्त्यांशी बोलताना मुख्याधिकारी डॉक्टर सुधीर गवळी म्हणाले की आम्ही सकारात्मक विचार करून योग्य ते निर्णय घेऊ अशी ग्वाही दिली व त्यानंतर निघून गेले.



## स्वेरी आयोजित सीईटीच्या सराव परीक्षांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

✔ **पंढरपूर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर हे दरवर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून या वर्षी दि.१६,२६,२८ एप्रिल, दि.०१ व ०४ मे असे एकूण पाच दिवस बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन मॉक सीईटी’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातुन एमएचटी- सीईटी २०२३ ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावासाठी स्वेरी कॅम्पस मध्ये या पाच मॉक टेस्टस चे आयोजन करण्यात आले होते. या सराव परीक्षांना संपूर्ण जिल्ह्यातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सीईटी च्या मुख्य परीक्षेला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये नक्कीच प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला आहे. महाराष्ट्र स्टेट सीईटी सेलकडून अभियांत्रिकी आणि औषधनिर्माण शास्त्र प्रवेशासाठी आवश्यक असणारी ’एमएचटी- सीईटी २०२३’ ही परीक्षा दि. ९ मे ते दि. २० मे दरम्यान संपूर्ण राज्यभरात घेतली जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर एमएचटी-सीईटी २०२३ या मुख्य परीक्षेचा सराव व्हावा व विद्यार्थ्यांना परीक्षेत अधिक उत्तम गुण मिळावेत या दृष्टीने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये दिवसातील दोन सत्रामध्ये शासनाच्या सीईटी प्रमाणे कॉम्प्यूटर बेस्ड सीईटी या सराव परीक्षांचे तब्बल पाचवेळा आयोजन केले होते. या पाचही सराव परीक्षांना विद्यार्थी व पालकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. स्वेरीने घेतलेल्या या सराव परिक्षांमुळे विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेचा अंदाज आला आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांच्या नेतृत्वाखाली या सराव परीक्षांचे आयोजन केले होते. या सराव परीक्षांसाठी प्रवेश प्रक्रिया विभागातील प्रा.योगेश सुरवसे, प्रा.उत्तम अनुसे, प्रा.अविनाश पारखे, प्रा.पोपट आसबे, प्रा.प्रज्ञा भुसे, प्रा.चेतन जाधव यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख व इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

# दीपकआबांच्या आमदारकीसाठी शरद पवारांना रक्ताचे पत्र

## पारे गावचे माजी सरपंच संतोष पाटलांचे निवेदन

✔ सुराज्य/सांगोला

सांगोल्याचा पुढील आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दीपक साळुंखे-पाटील झाले पाहिजेत यासाठी पारे गावचे माजी सरपंच संतोष पाटील यांनी आपल्या रक्ताने पत्र लिहुन खा. शरद पवार यांच्याकडे मागणी केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर दौऱ्यावर आले असताना सांगोला येथे कसब्याचे आ. रवींद्र धंगेकर याच्या सत्कार समारंभ कार्यक्रमांमध्ये पारे गावचे सरपंच संतोष पाटील यांनी आपल्या स्वतःच्या रक्ताने लिहिलेल्या पत्राद्वारे निवेदन देत मागणी केली. गेली चाळीस वर्ष आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये विविध पदे भुषवली आहेत. आपल्या मार्गदर्शनाखाली पक्षामध्ये काम करत सांगोला तालुक्यामध्ये विकास कामे मोठ्या प्रमाणावर केली आहेत सांगोल्यातील पाणी प्रश्न असो किंवा गोरगरीब जनतेची कामे असो या सर्व कामासाठी आबांनी मोठ्या प्रमाणावर वेळ दिलेला आहे.



परंतु सांगोला तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांची अनेक वर्षापासूनची इच्छा आहे की दीपक आबा साळुंखे पाटील याना सांगोल्यात तून आमदार झालेले. पाहण्याची सन २०१४ मध्ये तुम्हाला दिल्ली येथे भेटून गावच्या विकासासाठी विविध विकास कामांच्या मागण्या केल्या होत्या पण त्यावेळी तुम्ही नाही म्हणून सांगितले. पण गावात पोहचताच सगळी कामे मंजूर केली गेली होती हा अनुभव आसल्याने आपल्या मनात आले की तिथे कोणाचेच चालत नाही. त्यामुळे काम करणाऱ्या नेत्याला आमदार होतांना आम्हाला बघायचे आहे अशी भावनिक हाक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते सरपंच संतोष पाटील यांनी आपल्या रक्तरुपी शब्दाने पत्र लिहून निवेदन देत मागणी केली.

## विठ्ठल कार्पोरेशनचा संपूर्ण गाळप झालेल्या ऊसाचा प्रथम हप्ता अदा

✔ **कुर्डूवाडी** : विठ्ठल कार्पोरेशन लिमिटेड म्हैसगाव तालुका माढा या साखर कारखान्याचे सन २०२२ २३ करिता एकूण गाळप ५ लाख ५९ हजार ६०२. ७२१ इतके झाले आहे. गाळप हंगाम सन २०२२ २३ करिता कारखान्याकडे गाळपास आलेल्या सर्व सभासद बिगर सभासद ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस बिलापोटी प्रथम ऊस दर हप्ता रुपये २३०० प्रमाणे ५ मे रोजी अदा करण्यात आलेला आहे.

तरी प्रथम हप्ता चेक घेण्याचे राहिलेले आहेत, अशा सर्व शेतकरी व उत्पादकांनी कारखान्याच्या चेक गेट ऑफिस मधून चेक घेऊन जाण्याचा असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले.



## बाळराजे पाटील अनगरकर यांचा हगलूर येथे वंचित विद्यार्थ्यासोबत वाढदिवस साजरा

✔ सुराज्य/मोहोळ

माजी जिल्हा परिषद सदस्य बाळराजे पाटील अनगरकर यांचा हगलूर येथील आदिवासी आश्रमातील वंचित घटकातील विद्यार्थ्यां सोबत वाढदिवस साजरा करण्यात आला

बाळराजे पाटील अनगरकर यांचा वाढदिवस मोहोळ तालुक्यात विविध ठिकाणी विविध उपक्रमाव्दारे होत आहे परंतु मोहोळ तालुक्याच्या बाहेरही त्यांचे च्याहते हितचिंतक मित्रपरिवार आहे त्यांना माननारा वर्ग जनसमुदाय आहे हे नाकारून चालणार नाही. उत्तर सोलापूर येथील हगलूर येथे आदिवासी वंचित विद्यार्थ्यांच्या साठी संस्कार संजिवनी फौडेशन ही संस्था काम करते या संस्थेतील विद्यार्थी हे वंचित घटकातील आहेत त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावत तेथील विद्यार्थ्यांच्या सोबत त्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला या कार्यक्रमाचे आयोजन चिंचोली काटी येथील युवा नेते महेद्र वाघमारे यांनी केले होते यावेळी विद्यार्थ्यांची गरज ओळखून अन्नधान्य शालेय शैक्षणीक साहित्य दैनंदीन जीवनातील वस्तु फळे देवून केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला या उपक्रमामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते बाळराजे पाटीलही विद्यार्थ्यांसोबत रममान झाले होते त्यांनी विद्यार्थ्यां सोबत गप्पा मारत त्यांच्या व्यथाही जाणून घेतल्या त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होवून एकरूप झाले होते यावेळी चिंचोली काटी येथील युवा नेते महेंद्र वाघमारे शुक्राचार्य हावळे दादा नागणे नंदकुमार हावळे बिलाल शेख आदीसह मीत्र परिवार व संस्थेचे पदाधीकारी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांचे जीवन हे कंदिलाच्या काचेप्रमाणे : परांडे

✔ सुराज्य/श्रीपूर



कार्यकर्त्यांचे जीवन हे कंदिलाच्या काचेप्रमाणे असते! असे विचार मिलिंद परांडे केन्दीय महामंत्री विश्व हिंन्दू परिषद यांनी लोटस इंग्लिश मीडियम स्कूल, जुना कासेगाव रोड, पंढरपूर येथे रविवार, ०७ मे रोजी अयोजीत केलेल्या कार्यक्रमा मध्ये व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत आयोजित ’मातृशक्ती अभ्यास वर्ग २०२३’ या उपक्रमाच्या समारोप प्रसंगी मिलिंद परांडे केन्दीय महामंत्री बोलत होते.

विश्व हिंदू परिषद मार्गदशक मंडळ सदस्य ह भ प वासुदेव महाराज चवरे, प्रांत उपाध्यक्षा सौ माधवी संशी, प्रांत सहमंत्री ड. सतिश गोरडे, प्रांत संयोजिका ड. मृणालिनी पडवळ, सह सत्संग प्रमुख नटराज जगताप, समरसता सह प्रमुख बापूसाहेब भोळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

मिलिंद परांडे पुढे म्हणाले की, काच स्वच्छ असेल तर आतली ज्योत आणि प्रतिमा दिसते. ही काच पुन्हा पुन्हा स्वच्छ करावी लागते. ही ज्योत म्हणजे विश्व हिंदू परिषदेची विचारधारा होय. जात, धर्म, भाषा, प्रांत या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन विश्व हिंदू परिषदेची विचारधारा एक आहे. एक हिंदू कार्यकर्ता म्हणून जगण्याची ही विचारधारा आहे. मातृभूमी, धर्मविचार, संस्कृती या तीन गोष्टी समान आहेत. दिनांक ४ मे ते ७ मे २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या ’मातृशक्ती अभ्यास वर्ग २०२३’ या उपक्रमात पस्तीस वर्षांच्या पुढे आणि पासष्ट वर्षांच्या आतील सुमारे बावन्न महिलांनी सहभाग घेतला होता. प्रामुख्याने कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे ग्रामीण, पुणे पूर्व, पुणे पश्चिम, नगर, नाशिक या विभागातील महिलांचा यांमध्ये समावेश होता.

वर्गाचे उद्घाटन विश्व हिंदू परिषद प्रांत अध्यक्ष डॉ. पांडुरंग राऊत, प्रांत संघटन मंत्री अनिरुद्ध पंडित, प्रांत मंत्री संजय मुरदाळे, सौ. प्रेमलता बब्रुवाहन रोंगे व्हाईस चेअरमन विठ्ठल सहकारी साखर कारखाना वेणूनगर, उपाध्यक्षा सौ माधवी संशी, विभाग मंत्री डॉ. जयसिंह पाटील, प्रांत संयोजिका ड. मृणालिनी पडवळ, मातृशक्ती सहसंयोजिका शारदा रिकामे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी मार्गदशन करुन पांडूरंग राऊत यांनी वर्गास शुभेच्छा दिल्या. ’विश्व हिंदू परिषद : स्थापना व उद्देश’ या विषयावर प्रांत संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांनी विचार व्यक्त केले. संजय मुरदाळे यांनी ’मातृशक्ती कुटुंब प्रबोधन’ या विषयावर मार्गदर्शन केले. ड. वर्षा डहाळे यांनी ’लव जिहाद’, श्रीरंग राजे यांनी ’कार्यकर्ता’ , अभय उत्पात यांनी ’पर्यावरण’ या विषयावर प्रबोधन केले. शारदा रिकामे आणि प्रिया रसाळ यांनी बालसंस्कार केंद्राविषयी माहिती दिली. कृतिसत्रात कल्पना क्षीरसागर यांनी सीता चरित्र व चारित्र्य या विषयावर मार्गदर्शन केले.

विभाग मंत्री डॉ.जयसिंह भाऊसाहेब पाटील, बापूराव काशिनाथ भोळे, रविंद्र सखाराम साळे, रमाकांत देशपांडे, सौ.भाग्यश्री लिहिणे, सौ मालती गंभीर, सौ रश्मी पुंज, रामेश्वर कोरे, वालचंद जामदार, संतोष पापरीकर, गंगाधर कोळी, आदेश कांबळे, कृष्णा जामदार, आशा वाणी, रेवती हणमसागर, शीतल भोसले, प्रज्ञा सावंत , भक्ती साळवी, विजया रणभोर यांनी संयोजनात सहकार्य केले.

# नातेपुतेत काळोख्या रात्री माणुसकीचा सूर्योदय

✔ सुराज्य/नातेपुते

**शिखर शिंगणापूर येथील देवदर्शन आटपून पंढरपूर कडे निघालेल्या नववधूव वरांची कार मध्यरात्री पंक्चर होऊन बंद पडली. तेंव्हा गस्तीवरच्या पोलिसांनी मेकॅनिक मिळवून देऊन मध्यरात्री रस्त्यावर मदतीला धावण्याचे काम केले. त्यामुळे काळोख्या रात्री माणुसकीचा सूर्योदय झाल्याचे पहायला मिळाले.**

रविवार दिनांक ७ मे रोजी रात्री १२:३० वाजण्याच्या दरम्यान धारूर जिल्हा बीड येथील नवविवाहित नवरदेव साथीराम जेरे व त्याची पत्नी पल्लवी जेरे व नातेवाईक तीन महिला व गाडीचालक सतीश गायकवाड हे आपल्या चार चाकी ईरटीका गाडीमधून जेजुरी व शिखर शिंगणापूर येथील देवदर्शन आटपून पंढरपूर कडे चालले असता नातेपुते शिखर शिंगणापूर चौक नातेपुते बायपास रोड येथील मोठ्या दगडाला धडकल्याने पुढील डाव्या




बाजूचा टायर फुटून लो आर्म वाकडा झाला होता. गाडीबरोबर असणारी स्टेपणीही पंचर. त्यात रात्रीची वेळ व सोबत महिला. बायपास रोड वरून वाहनांची वर्दळ तुरळक असल्याने गाडी चालक सतीश गायकवाड नवविवाहित होते. नातेपुते पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी प्रविण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ चव्हाण, पो. कॉ.अनिल गडदे, पो.कॉ.हांगे हे सरकारी पोलीस गाडी घेऊन रात्री गस्त घालत असता त्या ठिकाणी जाऊन गाडी व त्यांची चौकशी केली. सतीश गायकवाड यांनी गाडीचा टायर फुटल्या संदर्भात व गाडीतील स्टेपणी पंक्चर असल्याचे सांगितले. गाडीत नववधू व महिला पाहून पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण यांनी नातेपुते येथील अविनाश ऑटोलाइन्स येथील मोटर मेकॅनिकल दिलीप नाळे यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती सांगून त्या ठिकाणी येण्यास सांगितले. रात्रीची वेळ असल्याने दिलीप नाळे झोपेत होते. परंतु कामाचा प्रामाणिकपणा व अपघातग्रस्तांना नेहमी मदत करण्याची भावना मनात असल्याने त्यांनी कोणताही विलंब न लावता गाडीला काय काय झाले आहे याची प्राथमिक चौकशी केली.

त्या क्षणी नाळे यांनी नातेपुते येथील संदेश ऑटोमोबाईल येथे जाऊन त्यांना झोपेतून जागे करून त्यांच्याकडून लागणारे स्पेअर पार्ट घेतले. गॅरेज वरून गाडी खोलण्यासाठी लागणारे साहित्य व सहकारी श्रीकांत यांना घेऊन घटनास्थळी पोहोचले. गाडीची पाहणी करून कामास सुरुवात केली. रात्री तीन वाजेपर्यंत गाडीचे काम केले. पंक्चर वाल्याशी संपर्क साधून टायर पंक्चर काढून आणून फिट केला. नववधू पल्लवी जेरे यांनी अविनाश ऑटोलाइन्स संदेश ऑटोमोबाईल तसेच नातेपुते पोलीस ठाण्याचे कर्मचारी मोटर मेकॅनिकल दिलीप नाळे त्यांचे सहकारी श्रीकांत यांचे आभार मानले. आमच्यासाठी परमेश्वराने देवदूत म्हणून पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ चव्हाण, मेकॅनिकल दिलीप नाळे यांना पाठवले असल्याचे नववधू साथीराम जेरे व त्याची पत्नी पल्लवी जेरे यांनी बोलून दाखवले.

## सुप्रीम कोर्टाच्या निकालाचे वारे

# सत्तासंघर्षाची धामधूम; राहुल नार्वेकर चर्चेत

सुराज्य/मुंबई

**राज्यातील सत्तासंघर्षाचा निकाल कोणत्याही क्षणी लागण्याची शक्यता असल्याने सर्वोच्च न्यायलयाच्या या निकालाकडे देशाचे लक्ष लागलेले आहे. न्यायालयाच्या निकालानंतर संबंधित निकालाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भूमिका महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. असे असले तरीही नार्वेकर हे १० ते १५ मे या कालावधीत लंडन दौऱ्यावर जाणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते.**



सत्तासंघर्षाच्या निकालाची सुनावणी ज्या खंडपीठाकडे होती त्यापैकी एक न्यायमूर्ती लवकरच निवृत्त होणार आहेत. त्यामुळे येत्या आठवड्याभरात कधीही यासंदर्भातील निकाल जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हा निकाल जाहीर झाल्यानंतर नार्वेकर यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते. न्यायालयाने निकाल दिल्यानंतर त्यानुसार आवश्यक ती अंमलबजावणी करण्याची जवाबदारी विधानसभाध्यक्षांकडे येऊ शकते. मात्र, नार्वेकर हे लंडनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. एका खासगी संस्थेच्या कार्यक्रमासाठी ते तेथे जात आहेत. याशिवाय त्यांची राष्ट्रकुल मंडळासोबत एक महत्त्वाची बैठक आहे. या बैठकीसाठीही ते लंडनला रवाना होत आहेत. राष्ट्रकुल मंडळाचे शिबिर मुंबईत आयोजित करण्यासाठी ते या भेटीत चर्चा करणार असल्याचे समजते.

**जपान दौऱ्यातून माघारी...**

दरम्यान, गेल्या महिन्यात नार्वेकर हे जपानच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांच्यासोबत विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ हेदेखील होते. त्यावेळी अचानक राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार त्यांच्या समर्थक आमदारांसह भाजपसोबत जाणार असल्याच्या चर्चेस उधाण आले होते. त्यानंतर लगेच नार्वेकर जपान दौरा सोडून मुंबईत दाखल झाले होते. मात्र, मी जपानमधील सर्व कामे करून परतलो आहे, दौरा अर्धवट सोडलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

दरम्यान, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू काही दिवसांपूर्वी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली होती. या भेटीची देखील महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली होती.

उद्धव ठाकरे यांनी देखील या भेटीवर भाष्य केलं होतं. सत्तासंघर्षाचा निकाल काही दिवसांमध्ये लागण्याची शक्यता असताना नार्वेकर विदेश दौऱ्यावर असल्यानं चर्चा सुरु आहे.

## लंडन दौरा ते सत्तासंघर्षाचा निकाल, आमदारांचे निलंबन, नार्वेकरांनी उलगडून सांगितले

महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी लंडन दौरा, आमदारांचं निलंबन प्रकरण यावर भाष्य केलं. कायद्याचं मला जे ज्ञान आहे, संविधानात दिलेल्या ज्या तरतुदी आहेत, विधानसभेचे नियम आहेत त्यानुसार आपल्या संविधानात ही तरतूद आहे की विधानसभेच्या अध्यक्षपद रिक्त असतं त्यावेळी उपाध्यक्षांकडे त्यांचे अधिकार असतात. अध्यक्ष ज्या क्षणी चार्ज घेतात, त्याक्षणी उपाध्यक्षांकडील अध्यक्षांचे अधिकार संपुष्टात येतात, असं राहुल नार्वेकर म्हणाले. लंडन दौऱ्याबद्दल बोलताना राहुल नार्वेकर यांनी तो दौरा पूर्वनियोजित असून त्याचा सुप्रीम कोर्टाच्या निकालाशी संबंध नाही, असं स्पष्टीकरण त्यांनी दिलं.



आपल्या देशातील सर्व कायदे पुढच्या काळासाठी लागू असतात. त्यामुळं मागं जाऊन कायदा लागू होऊ शकत नाही. निलंबनाची कारवाई विधानसभा अध्यक्ष करु शकतात. या कारवाईचा अधिकार कोणतीही इतर संस्था अध्यक्षांकडून काढून घेऊ शकत नाही. जोपर्यंत विधानसभा अध्यक्ष या सर्व याचिकांवर निर्णय देत नाहीत, तोपर्यंत कुठलिही कोर्ट, संविधानिक संस्था हस्तक्षेप करणार नाही, अशी खात्री आहे. त्यामुळं संविधानिक कक्षेत निर्णय होईल, अशी खात्री आहे. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात बोलताना राहुल नार्वेकर यांनी ही भूमिका मांडली. सर्वोच्च न्यायालय कायदेमंडळाचे प्रमुख आहेत. त्याचप्रमाणे विधिमंडळाचे प्रमुख अध्यक्ष आहेत. कार्यकारी मंडळाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री करत असतात. संविधानिक शिस्तीमध्ये ज्या संस्थेला जे काम दिलेलं आहे ते त्यांनी काम करावं, असं अपेक्षित आहे, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं.

लंडनचा दौरा हा पूर्वनियोजित असून त्याचा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी काही संबंध नाही, असं राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. दौरा पूर्वनियोजित असून ११ मे रोजी लंडनला जाणार असल्याचं राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, राहुल नार्वेकर काही दिवसांपूर्वी जपान दौरा अर्ध्यावर सोडून मुंबईत दाखल झाले होते. सध्या सुप्रीम कोर्टात प्रलंबित असलेल्या महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावरील निकाल लवकरच जाहीर होण्याची शक्यता असताना राहुल नार्वेकर यांच्या लंडन दौऱ्याची बातमी आल्यानं चर्चा सुरु झाल्या होत्या. त्यावर पडदा पडला आहे.

## विमाननगरमधील आयटी हबला आग

सुराज्य/पुणे

**विमाननगर भागात असणाऱ्या एका आयटी हबमध्ये मोठी आग लागल्याची घटना समोर आली आहे. आयटी पार्कच्या चौथ्या मजल्यावर ही आग लागली आहे. आगीची माहिती मिळताच पुणे महापालिका अग्निशमन दलाच्या ४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे.**



प्राथमिक माहितीनुसार, दुपारी १:३० च्या सुमारास चौथ्या मजल्यावर आग लागली. आगीमुळे संपूर्ण मजल्यावर धूर दिसू लागल्याने संबंधित कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी तात्काळ बाहेर आले. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, सद्या आग नियंत्रणात आणण्याचे काम अग्निशमन दलाकडून करण्यात येत आहे.

## मणिपूरचा हिंसाचार

### १७०० घरांची राखरांगोळी, ६० जणांचा मृत्यू

सुराज्य/मणिपूर : मणिपूरमध्ये मैतेई समुदायाला अनुसूचित जातीचा दर्जा देण्याच्या निर्णयाविरुद्ध झालेल्या आंदोलनादरम्यान हिंसाचाराची घटना घडली होती.

या घटनेत आतापर्यंत ६० जणांचा मृत्यू झाला असून १७०० घरे जाळण्यात आल्याची माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री एस. बिरेन सिंह यांनी दिली आहे. तसेच मणिपूरमध्ये सध्या तणावपूर्ण शांतात असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले. सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी या संदर्भात प्रतिक्रिया दिली.



## पाकचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अटक, अज्ञातस्थळी हलवले

सुराज्य/कराची

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात येत होते. पण आज (ता. ०९ मे) इस्लामाबाद न्यायालयाच्या बाहेर येताच त्यांना अटक करण्यात आली आहे. याबाबतची माहिती पाकिस्तान वृत्तपत्र डॉनकडून देण्यात आली आहे.



गेल्या अनेक महिन्यांपासून तोशखाना प्रकरणी पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर अटकेच्या कारवाईची टांगती तलवार होती. पण आज अखेरीस जेव्हा ते इस्लामाबादच्या न्यायालयाबाहेर दाखल झाले, त्यावेळी त्यांना लगेच पाकिस्तानी रेंजर्सकडून अटक करण्यात आले. अल कादीरा ट्रस्ट प्रकरणा त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पाकिस्तानचे आयजी अकबर नासीर खान यांनी दिली आहे.

## निर्मात्याला फाशी दिली पाहिजे : आव्हाड

सुराज्य/मुंबई

**कथित लव्ह जिहादवर आधारित 'द केरला स्टोरी' वरुन राजकीय आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकात भरसभेत या चित्रपटाबद्दल वक्तव्य केल्यानंतर हा वाद आणखी वाढला आहे. भाजप शासित राज्यांमध्ये हा चित्रपट टॅक्स फ्री केला जात आहे, तर पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सरकारने या चित्रपटावर बंदी घातली आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केरळ राज्य आणि तेथील महिलांची बदनामी करणाऱ्या 'द केरला स्टोरी'च्या निर्मात्याला भरचौकात फाशी देण्याची मागणी केली आहे.**




गेल्या आठवड्यात द केरला स्टोरी' रिलीज झाला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुदीप्तो सेन यांनी केले. तर विपुल अमृतलाल शाह चित्रपटाचे निर्माते आहेत. या चित्रपटात नर्स बनण्याची इच्छा असलेल्या मुलींची कथा आहे. मात्र त्या ISIS च्या जाळ्यात अडकून दहशतवादी होतात. या चित्रपटात धर्म परिवर्तनाचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला आहे. भाजपशासित उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी चित्रपट टॅक्स फ्री केला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेस नेत्या ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या राज्यात चित्रपटावर बंदी घातली आहे.

## बस पुलावरून कोसळली; २२ जणांचा मृत्यू

सुराज्य/मध्यप्रदेश

मध्यप्रदेशातील खारगोन जिल्ह्यातील बोराड नदीवरील पुलावरून प्रवाशांनी भरलेली बस ५० फूट खाली पडून मोठी दुर्घटना घडली आहे. या अपघातात आतापर्यंत २२ जणांचा मृत्यू झाला असून ३० हून अधिक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. बस क्रमांक MP10-P-7755 ही मां शारदा ट्रॅव्हल्सची बस खारगोन जिल्ह्यातून इंदूरला जात असताना खारगोन-ठीकरी मार्गावरून जात असताना दसंगा गावाजवळ हा अपघात झाला. बस नदीवरील पुलावरून तब्बल ५० फुट खाली अचानक पडली असून या बसमध्ये ४० हून अधिक प्रवासी प्रवास करत होते. बस पडल्यानंतर मोठा आवाज झाल्यानंतर स्थानिक नागरिकांना पोलिसांना यासंदर्भात माहिती देत बचाव कार्यात मदत केली. त्यांनी सांगितले की, या मार्गावरून बसेस दररोज भरधाव वेगाने जातात.



अनेक वेळा आम्ही बसचालकांना अडवले असता त्यांनी दादागिरी केली आहे. बोराड नदी कोरडी असल्यामुळे आतापर्यंत मृतांची संख्या १५ झाली आहे. जर नदीत पाणी असते, तर मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता होती.

## जिवा महालांच्या वंशजांना मदत

सुराज्य/सातारा : छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक राहिलेल्या जिवा महाला यांच्या १४व्या पिढीतील वंशजांची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे त्यांच्या घरातील मुलीचे साध्यासोप्या पद्धतीने लग्न होणार असले तरी तो खर्च करणे महाले कुटुंबाला शक्य नव्हते. याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे यांना मिळताच त्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे.

शिवकाळात आपल्या अपार धैर्याने अजरामर झालेल्या जिवा महाला यांच्या वंशजांच्या १४ व्या पिढीतले प्रकाश महाले हे महाबळेश्वरमधील कोंढवली गावी वास्तव्यास आहेत. मात्र ते गेल्या काही वर्षांपासून पक्षाघाताच्या व्याधीने अंथरुणाला खिळून आहेत. त्यांच्या या आजारपणामुळे त्यांची पत्नी जयश्री महाले यांना शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागत आहे. त्यामुळे अत्यंत प्रतिकूल त्यांनी प्रतीक आणि प्रतीक्षा या दोन अपत्यांना लहानाचे मोठे केले आहे. मात्र मुलगी प्रतीक्षा हिचे पुढील तीन दिवसात (१२ मे) प्रतीक्षा महाले हिचा विवाह होणार आहे.

## 'द केरळ स्टोरी' चित्रपट करमुक्त

सुराज्य/मुंबई

सुदिप्तो सेन यांनी दिग्दर्शित केलेला 'द केरळ स्टोरी' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपली विजयी घोडदौड करत आहे. पण या चित्रपटावरून आता राज्यात नव्या राजकारणाला सुरूवात झाली. या चित्रपटाची कथा ही जातीय दंगली पसरवू शकते, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या चित्रपटावर राज्यात बंदी आणली आहे. तर दुसरीकडे मात्र, मध्य प्रदेश आणि त्यापाठोपाठ आता उत्तर प्रदेशातही हा चित्रपट टॅक्स फ्री करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्वीट करत दिली. त्यामुळे आता या चित्रपटामुळे एका नव्या राजकारणाला सुरूवात झाल्याचे पाहायला मिळत आहे.

चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर देशभरातून या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटाने पहिल्या विकेंडला म्हणजेच रविवारी ३५.२५ कोटी रूपयांचा गल्ला जमवला. तर सोमवारी कामाचा दिवस असताना देखील या चित्रपटाने तब्बल १५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे गेल्या चार दिवसांत या चित्रपटाने ४६ कोटी रुपयांचा गल्ला जमावला असल्याची माहिती समोर आली आहे.

या चित्रपटाला मिळत असलेला प्रतिसाद पाहता सर्वात पहिल्यांदा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी हा प्रदर्शनाच्या दुसऱ्याच दिवशी हा चित्रपट करमुक्त करण्याची घोषणा केली. तसेच त्यांनी हा चित्रपट पाहण्याचे देखील आवाहन राज्यातील जनतेला केले आहे. त्यांच्यानंतर आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्वीट करत 'द केरळ स्टोरी' चित्रपट टॅक्स फ्री करण्याची घोषणा केली आहे.

'The Kerala Story' उत्तर प्रदेश में टैक्स फ्री कि जाएगी। असे ट्वीट त्यांच्याकडून करण्यात आले आहे. तर येत्या १२ मे ला आदित्यनाथ हे त्यांच्या कॅबिनेटसोबत हा चित्रपट पाहायला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## तिर्थयात्रेकरूंसाठी आनंदवार्ता

# रेल्वेची दक्षिण भारत शुभ यात्रा स्पेशल ट्रेन

### रामेश्वरम, तिरुपती, श्रीशैलमचे दर्शन सुलभ

सुराज्य/वर्धा

**महाराष्ट्र व छत्तीसगड या राज्यातील यात्रा करण्यास इच्छुक असणाऱ्यांना दक्षिण मध्य पूर्व रेल्वे विभागाने विशेष सोय दिली आहे. विलासपूर ते रामेश्वरम् या दरम्यान दक्षिण भारत शुभ यात्रा ही विशेष गाडी धावणार आहे.**

पंचवीस मे रोजी यात्रा शुभारंभ विलासपूर येथून होणार आहे. या स्थानकासह भाटापारा, नेवरा, रायपूर, दुर्ग, राजनांदगाव, गोंदिया, तिरोडा, भंडारा रोड, नागपूर, सेवाग्राम व बल्लारशा या स्थानकांतून पर्यटक घेतल्या जाणार आहेत. त्यानंतर रामेश्वरम्, मदुराई, तिरुपती व मरकपूर येथे थांबे राहणार. या स्थानक परिसरातील श्री शैलम, मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग व अन्य स्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

सात दिवस, आठ रात्री असा कालावधी असून प्रवास, भोजन, हॉटेल मुक्काम, पर्यटन दर्शन, गाडी अशा सुविधा पंधरा हजार रुपयांत मिळतील. एकतीस मे रोजी परतीचा प्रवास सुरू होणार. अकरा डब्यांची ही गाडी नॉन एसी आहे.

'एक भारत, श्रेष्ठ भारत' योजनेअंतर्गत ही यात्रा असल्याची माहिती इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझमच्या सह व्यवस्थापक डॉ. क्रांती सावरकर यांनी माध्यमांना दिली आहे.




## सरकार निवडणुकांना घाबरत आहे : पवार

सुराज्य/वाई

**'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सरकार पुढे पुढे ढकलत आहे, याचा अर्थ या सरकारला लोकांना सामोरे जायला भीती वाटते आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सातारा येथे सांगितले.'**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६४ व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी साताऱ्यातील कर्मवीर समाधी परिसरात शरद पवार यानी अभिवादन केले. त्यावेळी अनिल पाटील, श्रीनिवास पाटील, रामशेठ ठाकुर, भगिरथ शिंदे, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते. यानंतर पवार साताऱ्यात पत्रकारांशी बोलत होते. फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणजे साडेतीन जिल्ह्यातील जिल्ह्यांचा पक्ष आहे



या वक्तव्यावर शरद पवारांनी समाचार घेतला. ते काहीही बोलू शकतात. त्यांचं वैशिष्ट्य आहे की ते काहीही काम न करता फक्त शब्दांचा खेळ करण्यात वाक्बगार आहेत. त्यातील ते एक आहेत.

राज्यात एकीकडे सत्ताधारी विरुद्ध विरोधी पक्ष असा राजकीय सामना चालू असताना दुसरीकडे महाविकास आघाडीमधील मित्रपक्षांमध्येही एकमेकांवर आरोप केले जात असल्याचं दिसून येत आहे. यावर पवार म्हणाले, आघाडीमध्ये सर्वजण सगळ्या मुद्द्यांवर सहमत असेलच असे होत नाही. सर्वांची ध्येय धोरणे वेगळी असतात त्याप्रमाणे प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने व्यक्त करत असतो.

## आफताबनेच केली श्रद्धाची हत्या

नवी दिल्ली : श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणात आरोपी आफताब पूनावालाच्या विरोधात दिल्लीच्या साकेत न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा निश्चित केला आहे. तसंच कलम २०१ अंतर्गत गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्याचाही आरोप निश्चित केला आहे.

आफताब पूनावालाने त्याची लिव्ह इन पार्टनर श्रद्धा वालकरची हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले. हे तुकडे त्याने दिल्लीच्या महारौलीच्या जंगलात आणि इतर भागांमध्ये फेकले होते. काही तुकडे त्याने ग्राईंडरमध्ये बारीक केले होते आणि हत्येचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याला नोव्हेंबर महिन्यात अटक करण्यात आली. दिल्लीतल्या साकेत न्यायालयाने आफताबवर आरोप निश्चित केले. आफताबच्या विरोधात हत्येचा आणि हत्या केल्यानंतर पुरावे नष्ट केल्याचा खटला चालणार आहे.

# सर्वंकष सर्व्हेक्षणाच्या बैठकीला झोन अधिकाऱ्यांचीच अनुपस्थिती

## अधिकारी काम मनावर घेऊन करणार का?




✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या मिळकती सर्वांकष सर्व्हे क्षणांतर्गत मंगळवारी झालेल्या दुसऱ्या आणि शेवटच्या बैठकीला सर्व्हेक्षणाचा ज्यांच्यावर प्रमुख भार आहे ते झोन अधिकारीच गैरहजर होते. त्यामुळे हे सर्व्हे क्षण अधिकारी काम मनावर घेऊन करणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सोलापूर महापालिकेच्या वतीने शहरात मिळकतींचे सर्वांकष सर्व्हेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी दुसरे प्रात्यक्षिक प्रशिक्षण मंगळवारी सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडले. त्याप्रसंगी सर्वेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. महापालिका प्रशासनाकडून यापूर्वी वर वरचा मिळकती, नळ कनेक्शन शोधण्याचा सर्व्हे करण्यात आला होता. परंतु महापालिकेच्या इतिहासात प्रथमच महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली असा सर्वांकष सर्व्हे करण्यात येणार आहे. यामधून महापालिकेला महत्त्वपूर्ण अशी माहिती उपलब्ध होणार आहे.

यासाठी मिळकत कर विभागाकडील १५० कर्मचारी आणि सामान्य प्रशासन विभागाकडून ११३ असे एकूण २६३ कर्मचारी हे सर्वेक्षणाचे काम करणार आहेत. तसेच त्यावर भरारी पथक नेमण्यात येत असून आठ विभागातील आठ झोन अधिकारी हे एका अवेक्षकसह पाहणी करणार आहेत. यामध्ये झोन अधिकाऱ्यांचा महत्वाचा सहभाग राहणार आहे. मात्र या महत्वपूर्ण बैठकीत केवळ एकच झोन अधिकारी उपस्थित होता, अशी माहिती आहे. त्यामुळे हे सर्व्हेक्षण अधिकारी काम मनावर घेऊन करणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पडताळणी करून माहिती घ्या : आयुक्त

कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधत पडताळणी करून माहिती संकलित करावी अशा सूचना महापालिका आयुक्त शितल तेली- उगले यांनी दिल्या आहेत. पथकातील कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन खातरजमा करूनच माहिती संकलित करावयाची आहे. फोटो काढणे आवश्यक आहे, कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे हे काम करावे नागरिकांशी चांगल्या पद्धतीने सुसंवाद साधून आवश्यक ती माहिती कर्मचाऱ्यांनी संकलित करावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ, मच्छिंद्र घोलप, सहायक आयुक्त पुष्पगंधा भगत, सहायक आयुक्त विक्रमसिंह पाटील,नगर अभियंता लक्ष्मण चालवादी, कर संकलन विभाग प्रमुख युवराज आदींसह अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

### अन्यथा दुप्पट कर आकारणी करण्यात येईल : पोळ

या सर्वेक्षण अंतर्गत कर्मचाऱ्यांना नागरिकांनी खरी माहिती द्यावी. तेच त्यांच्यासाठी हिताचे ठरणार आहे. अन्यथा दुप्पट कर आकारणी करण्यात येईल. नागरिकांनी बांधकाम परवाना व इतर कागदपत्रे अगोदरच काढून ठेवावीत. मिळकतदारांकडे बांधकाम परवाना आणि वापर परवाना बंधनकारक आहे. नव्या इमारती बाबत वापर परवाना हा बंधनकारक ठरणार आहे. नसल्यास पुढील वर्षी दंड आकारण्यात येणार असल्याचे उपायुक्त पोळ यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेस तालुकाध्यक्ष पदाचा वाद; पटोले यांनी नेमली दोन सदस्यांची समिती

✔ सुराज्य/सोलापूर



गेल्या अनेक महिन्यांपासून काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष पदाचा वाद सुरू आहे. हा वाद माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यानंतर आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यापर्यंत गेला आहे. नाना पटोले यांनी यासंदर्भात दोन सदस्यीय समिती नेमली असून या समितीचा अहवाल सर्वांना बंधनकारक राहतील, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे आता ही दोन सदस्य समिती काय निर्णय घेणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी जिल्हाध्यक्ष पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर नव्याने काही निवडी जाहीर केले आहेत. यामध्ये सांगोला, माढा, मंगळवेढा, आणि बार्शी या तालुकाध्यक्षांच्या निवडी चुकीच्या पद्धतीने झाल्याचा आरोप काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांनी केला आहे. हा वाद माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यापर्यंत गेला होता. त्यांनी दोन्ही गटांना सामोपचाराने भूमिका घ्यावी अशा सूचना केल्या होत्या मात्र हा वाद सुरूच होता. दरम्यान प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले हे दोन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष चुकीच्या निवडी संदर्भात लक्ष घालावे व स्वतंत्र निष्ठावंत अध्यक्षांची बैठक घ्यावी अशी मागणी पटोले यांच्याकडे केली होती याची दखल घेऊन या सर्व तालुकाध्यक्षांची पंढरपूर विश्राम गृह येथे स्वतंत्र बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये मंगळवेढ्याचे नंदकुमार पवार, माढ्याचे सौदागर जाधव, मोहोळचे सुरेश शिवपुजे, सांगोल्याचे सुनील भोरे, बार्शीचे तानाजी जगदाळे, या सर्वांचा कार्यकाल आठ महिन्याचा व काही जणांचा संघर्षमय झाला असे सांगत नवीन निवडी कशा बेकायदेशीरपणाने झाल्या आहेत ते पुराव्यानिशी या सर्वांनी सांगितले. त्यावेळी पटोले यांनी याबाबत दोन सदस्य समिती नेमली आहे. यामध्ये निरीक्षक म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शामभाऊ उमाळकर व माजी आमदार रामहरी रुपनवर यांची नियुक्ती केली आहे. या दोघांना प्रत्येक तालुक्याचा अहवाल घेऊन माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना सादर करावा असे सांगण्यात आले. यावेळी महाराष्ट्र किसान काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. संदीप साठे, जिल्हा उपाध्यक्ष राजकुमार पवार, हभिाऊ पाटील, मंगळवेढाचे माजी अध्यक्ष सुरेश कोळेकर, निवेदिता आरगडे, टेंभुर्णी शहराध्यक्ष सोमनाथ कदम आदी हजर होते.

### समितीचा अहवाल बंधनकारक : पटोले

दोन सदस्यीय कमिटी सर्वांची चर्चा करून सुशीलकुमार शिंदे यांच्याबरोबर अंतिम चर्चा करून प्रदेशला अहवाल पाठवतील त्याच्यानंतर जो निर्णय येईल तो सर्वांसाठी बंधनकारक असेल नाना पटोले यांनी सांगितले आहे.

# रुपाभवानी येथील सुका कचरा विक्री केंद्रास प्रतिसाद

### आता जुळे सोलापूरसह तीन ठिकाणी उभारणार केंद्र



✔ सोलापूर : महापालिका व बायोएनर्जी कंपनीच्या संयुक्त विद्यमाने रुपाभवानी ट्रान्स्फर स्टेशन येथे पहिले सुका कचरा विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आता महापालिका दुसऱ्या टप्प्यात जुळे सोलापूर एचएसआर पाणी टाकी, इंद्रधनू ट्रान्स्फर, लेपसी कॉलनी येथे सुका कचरा विक्री केंद्र उभारण्याचे नियोजन करत आहेत.

शहरात रोज साधारण २४० टन कचरा जमा होतो. त्यात ६० टक्के सुका कचरा असतो. हा सुका कचरा हा महापालिकेच्या संकलन केंद्रावर येण्याऐवजी कर्मचाऱ्यांकडून इतरत्र विकले जात असल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे कचऱ्याचे योग्य नियोजन होण्यासाठी व कचऱ्यापासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने बायोएजर्नी कंपनीच्या माध्यमातून रुपाभवानी ट्रान्स्फर स्टेशन येथे सात महिन्यांपूर्वी पहिले सुका कचरा विक्री केंद्र स्थापन केले. या केंद्रावर महापालिकेच्या बिगारींसह सामान्य नागरिकांनाही कचरा विकण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. बाजारभावापेक्षा जास्त दराने कचरा खरेदी करून या बदल्यात पैसे आणि शॉपिंगचे कुपनही देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे या केंद्राला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

येथून सात महिन्यात १८७ मेट्रिक टन कचरा विक्री करून मोबदला घेतला आहे. नागरिक बाटल्या, काचेच्या वस्तू, कार्डबोर्ड, रद्दी पेपर, वेगवेगळ्या प्रकारचे प्लास्टिकच्या वस्तू, पिशव्या, ई-कचरा आदी या केंद्रावर जमा करत आहेत. त्यांना लाभांशही देण्यात येत आहे. शहरात एकूण दहा केंद्र उभारण्यात येणार आहेत.

रूपाभवानी केंद्राला चांगला प्रतिसाद मिळत असल्याने लवकरच महापालिकेच्यावतीने जुळे सोलापूर एचएसआर पाणीटाकी, इंद्रधनू ट्रान्स्फर , लेपसी कॉलनी येथे सुका कचरा विक्री केंद्र उभारण्यात येणार आहे.

### लवकरच सुका कचरा विक्री केंद्र सुरू होतील : घोलप

रूपाभवानी येथील केंद्रावर नागरिकांचा व बिगारी कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. तसा अहवालही मिळाला आहे. आता लवकच तीन ठिकाणी सुका कचरा केंद्र उभारण्यासाठीचे नियोजन करण्यात येत आहे. तसा प्रस्ताव पाठवला असल्याचे महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी सांगितले.



**जनावरांचा रास्ता रोको**

मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. वारंवार अपघातही होतात. महानगरपालिका मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. शहरात जागोजागी अशी जनावरांची फौज रस्ता रोको करताना आढळून येत आहे. पुणे नाका येथील अँबेसिडर हॉटेल समोरील हे चित्र.

### 'सफाई मजदूर काँग्रेसचा इतिहास'चे उद्या प्रकाशन

✔ सोलापूर : अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसचा इतिहास या पुस्तकाच्या हिंदी आणि मराठी आवृत्तीचे प्रकाशन सोलापुरात शनिवार, ११ मे रोजी माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. सफाई मजदूर काँग्रेसचा इतिहास संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष चरणसिंह टाक यांनी लिहिला आहे.

या संस्थेची स्थापना वासुदेवराव चांगरे यांच्या पुढाकाराने १९६४ साली झाली. पुस्तकाचे प्रकाशन सोलापुरात फडकुले सभागृह येथे ११ मे ला सायंकाळी ४:३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमात स्वतः चरणसिंह टाक तसेच आरपीआयचे राजा सरवदे आणि सफाई मजदूर काँग्रेसचे राष्ट्रीय प्रतिनिधी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. आज पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. यावेळी संघटनेचे प्रदेश पदाधिकारी नागनाथ गदवालकर, बाली मंडेपु, सायमन गड्डू, दशरथ आडाकूल, श्रीनिवास रामगल, गोपाल पिडगुलकर आदी उपस्थित होते.

# सुशील विचारधारा संस्थेतर्फे ढोर समाज वधू-वर मेळावा

✔ सोलापूर : सुशील विचारधारा बहुउदेशिय सामाजिक संस्थेच्यावतीने ढोर समजाचा वधू वर मेळावा शनिवार १३ मे रोजी सकाळी ९ ते सांयकाळी ६ वाजेपर्यंत पुष्पस्नेह लॉन अंत्रोळीकर नगर येथे आयोजित केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सच्चिदानंद व्हटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्याला मुंबई, पुणे, औरंगाब नाशिक, कोल्हापूर, सांगली मिरज, मराठवाडा, विजापूर, गुलबर्गा, बसवकल्य हुबळी, बागलकोट, धारवाड बेळगाव, निपाणी व कर्नाटकातून तसेच हैद्राबाद, दिल्ली व परदेशातुन ही वधुवरांचा मेळावा मो प्रमाणावर सहभाग मेळाव्यास वधु वर उपस्थित राहणार आहेत. मेळावा डिजिटल असणार आहे वधू-वरांची माहिती डिस्प्लेवर दाखवण्यात येणार असल्याचेही व्हटकर यांनी सांगितले. मेळाव्याला उपस्थित राहणाऱ्यांची जेवणाची आणि नाश्त्याची व्यवस्था ही करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त इच्छुकांनी या मेळाव्याला उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला गंगाधर जोगधनकर, केशव इंगळे, सदाफुले, जोगधनकर आदी उपस्थित होते.

**खरीप हंगाम खरीप पूर्व आढावा बैठक**

# शेतकऱ्यांसाठी आवश्यक मोहीम राबवा : आ.देशमुख

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



महाडीबीटी योजनेमार्फत दक्षिण तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त शेतकऱ्यांना योजनेचा लाभ द्यावा, खरीप व रब्बी हंगामातील पिकांचे हेक्टरी उत्पादन वाढवणे, शेतकऱ्यांसाठी आवश्यक मोहीम राबवा, जमिनी सुधारणा, प्रक्रिया उद्योग, कृषी पर्यटन केंद्र वाढीसाठी विशेष प्रयत्न करावे व दक्षिण तालुक्याचे नावलौकिक वाढवावे अशा सूचना आ. सुभाष देशमुख यांनी केल्या.

आ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम २०२२ २३ खरीप पूर्व आढावा बैठक पार पडली.

त्यामध्ये आ. देशमुख यांनी वरील सूचना केल्या. या आढावा बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी जयवंत कवडे, डॉ. लालासाहेब तांबडे, तहसीलदार गायकवाड, गटविकास अधिकारी वाघ, दक्षिण सोलापूर, डॉ. व्ही.टी.जाधव, डॉ. ज्योती पाटील, मळसिद्ध मुगळे आदी उपस्थित होते. यावेळी दक्षिण तालुक्यातील पीक स्पर्धा मधील जिल्हास्तरीय चार व तालुकास्तरीय पाच पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांचा तसेच सन २०२२-२३ मध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील उत्कृष्ट काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आ. देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. ज्योती पाटील, डॉ. व्ही.टी. जाधव यांनी मार्गदर्शन केले. कृषी अधिकारी शिल्पा कसबे यांनी आभार मानले व कृषी सहायक अशोक राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

# हिश्श्याच्या पैश्यावरून मारहाण; चौघांवर गुन्हा




✔ सोलापूर : आईच्या नावावर आलेल्या पैशाची समान वाटणी करा असे म्हणताना महिलेला मारहाण व त्यांच्या मुलाला मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत लक्ष्मी मोहन इगवे (वय-४५, रा.केगाव, नागोबा मंदिर जवळ) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. लक्ष्मी इगवे या ७ मे रोजी घरात काम करत असताना आरोपी अमोल ऊर्फ आमदार इगवे यांनी त्यांना बोलावून घेतले. त्याने कुठले पैसे,माझ्या आईच्या नावाने आलेले पैसे आहेत असे सांगितले. यावेळी लक्ष्मीच्या मुलाच्या वाटणीला आलेले चौघांच्या हिश्याचे पैसे समान वाटणी करा असे म्हणाले. त्यावेळी आरोपींनी दगडाने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शिवाय आरोपी बाबा इगवे, झंकू इगवे यांनी पैसे देणार नाही म्हणत त्यांना मारहाण केली. या प्रकरणी वरील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक ढोबळे करत आहेत.

## शहरातून दोन दुचाकी पळवल्या

✔ सोलापूर : शहरातील दुचाकी चोरीचे सत्र सुरूच असून दुचाकी चोरीसोबत मोबाईल चोरीच्या घटनाही घडत आहेत. यात सोमवारी शहरातील एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीतील रंगराज नगर येथून गणेश पांडुरंग आडम (वय-३२, रा.लक्ष्मी नारायण नगर,रंगराज नगर) यांच्या घरासमोर लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीजी.४०१० ही अज्ञाताने चोरली. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रुपनर हे करीत आहेत. शिवाय कुंभार वेस येथील खत दुकानासमोर लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३. एपी.३४५२ ही अज्ञात चोरट्याने चोरली.याबाबत उदयकुमार विश्वंबर तरकसबंद (वय-६१,रा.उत्तर कसबा) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरांवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पो. हे.कॉ. आरेनवरु हे करीत आहेत.

## चोरट्याने वृद्धाचा मोबाईल पळवला

✔ सोलापूर : एसटी स्टॅन्ड परिसरात एसटीमध्ये चढत असताना किशोर गणपत सुरू (वय-६३,रा.शांती निकेतन कॉलनी) यांच्या खिशातील मोबाईल अज्ञाताने चोरला.याबाबत त्यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.ही घटना ८ मे रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या दरम्यान घडली, या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

# वारकरी संप्रदायाचे पुनर्जिवन होण्याची गरज : मिटकरी

✔ सुराज्य/बार्शी




मार्केटिंगमध्ये प्रवीण असणार्याअ भोंदू, बुवा-बाबांमुळे समाजाचे मोठे नुकसान होत असून माणुसकी धर्म जपणार्या. वारकरी संप्रदायाचे पुंनरज्जीवन होण्याची गरज आहे. असे मत विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले.

येथील भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी आणि मातृभूमी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नगर दैवत श्री भगवंत प्रगट दिनानिमित्त आयोजित सहाव्या भगवंत व्याख्यानमालेत वारकरी संप्रदायाची गौरवशाली परंपरा आणि सद्यस्थिति या विषयावर ते बोलत होते. उद्योजक बन्सीधर शुक्ला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बार्शी नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, प्राचार्य डॉ.अब्दुल शेख, डॉ.आशीष रजपूत, संयोजक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, सनदी अधिकारी अविनाश सोलवट व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी मिटकरी यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज, संत कबीर यांचे अभंग सुविचार, सांगत वारकरी संप्रदायाच्या गौरवशाली परंपरेचा आढावा घेतला. यावेळी मिटकरी यांनी समाजाला घातक व अनिष्ट रूढीप्रथा अंधश्रध्दावर टीका केली.

यावेळी मिटकरी म्हणाले भेद, विषमता, यावर टीका करत संतांनी माणुसकी शिकवली, संतांनी मानवता धर्म सर्व श्रेष्ठ मानला, संतांनी भूतदया, अहिंसा, सदाचार, डोळस भक्ति, विवेक, महिलांविषयी आदर, यांची शिकवण आपल्या कीर्तन-प्रवचनातून दिली. संतांनी अंधश्रद्धा, निर्मूलन केले, संतांनी पर्यावरण प्रेम शिकविले, जेथे कीर्तन-प्रवचन करतो तेथे अन्न सुद्धा घेऊ नये असे संतांनी सांगितले, मात्र आज काही कीर्तनकार हे आपले दुकानदारी उघडून बसले आहेत, ते विनोदाचार्य झाले आहेत, अशा बाजार मांडणार्यार आणि पैशाच्या मागे लागलेल्या ढोंगी, अध्यात्म गुरूंपासून समाजाने सावध राहिले पाहिजे, संत गाडगे बाबांनी राज्यात किर्तनांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करत माणुसकीचा सेवाधर्म सांगितला, त्यांनी ठिकठिकाणी शाळा आणि धर्मशाळा उघडल्या, अशा समाजाला दिशा देणार्याध कीर्तनकारांमुळेच माणसातील देव जागृत झाला. मात्र धिरज महाराजानंसारखे तथाकथित अध्यात्म गुरु महाराष्टात येतात आणि साईबाबांपासून संत तुकारामापर्यंत अनेकांवर लज्जास्पद शेरेबाजी करतात, हे दुर्दैव आहे. वारकरी संप्रदाय काळाच्या ओघात नामशेष होऊ नये, यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे, छत्रपती शिवराय, राजर्षी शाहू महाराज, हे धार्मिक होते पण अंधश्रद्धाळू नव्हते, असे मिटकरी यांनी सोदाहरण सांगितले, यावेळी अपर्णा दळवी यांनी सूत्र संचालन केले. याप्रसंगी समाजाच्या विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते.